# ाणूस

राक्षसपार्टी
मशहूर तबलिये अल्लारखा
आणि देवपार्टी
महाग्यानी पंडित रविशंकर महाराज
.................
सभागार दणाणून जाते–
स्वरांनी, तालांनी, टाळ्यांनी.
पुन्हा...पुन्हा...पुन्हा

एप्रिल ७०
ळीस पैसे



१८ एप्रिल १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक सेहेचाळीसावा
संपादक : श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे
१०२५ सदाशिव, पुणे ३०   दूरध्वनी : ५७३५९

किमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

आपला १४ मार्चचा माणूस अंक मी वाचला. त्यातील यशवंतराव चव्हाण हा लेख वाचत असताना पान नं. ९० वरील दोन गोष्टी माझ्या मनास खटकल्या. त्या लेखात "त्या वेळी महाराष्ट्रात असल्याचे लिहिले असून महाराष्ट्राचे पहिले मुख्य प्रधान होण्याचा मान खेरांऐवजी अप्पाजी जोशींना दिला असता असे वाक्य आहे.

वरील दोनही गोष्टी चुकीच्या आहेत. त्या वेळी वर्धा महाराष्ट्रात नव्हते तर मध्यप्रदेशांत होते व श्री. खेर हे मुख्यप्रधान नव्हते तर श्री. खरे हे मुख्यप्रधान होते.

खरे या शब्दाऐवजी 'खेर' ही छपाईचीही चूक असल्याची शक्यता आहे.

परतु वरील दोनही गोष्टी आपण जातीने लक्ष घालून यापुढे वरील चुका सुधाराव्यात असे मला वाटते.

मार्च ३१. ७०.   गं. अ. जोशी, पुणे.

श्री. अनत भावे यांची 'बिस्मार्क' उत्कृष्ट. दादूमियांची "दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा" फारच टॉप. दादूमियांचा परिचय करून द्याल का ?

भविष्याऐवजी दोन पाने छोटी ऐतिहासिक गोष्ट दिल्यास उत्तम.

मार्च ३०. ७०.   र. वा. पिंपळीकर, जळगाव.

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

## मुंबई वार्ता [ थोडं खाजगी ]

संपादक महाशय,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष. पत्र लिहिण्यास कारण की खरं म्हणजे मला तुमचं वार्तापत्र लिहिण्याचा या आठवड्यात कंटाळा आला आहे. मुंबईची हवा इतकी बेक्कार आहे की काही करावस वाटत नाही. आणि आता एप्रिल सुरू झाला. अंगातून एवढा घाम फुटतो की स्वतःलाच आश्चर्य वाटतं. लोकलच्या गाड्या, त्यातली ती गर्दी नको वाटते. उपनगरातल्या वसाहतीमध्ये तर एवढे डास झाले आहेत की सांगता सोय नाही. खरं म्हणजे या वसाहती डासांच्याच. अधेमधे माणसं राहतात एवढंच. आणि उपनगरातल्या ऐसपैस वस्त्यांमध्ये माणूस घामाने एवढा बेजार होत असेल तर परळ गिरगावसारख्या दाट वस्त्यांमधल्या खुराड्यात राहणारे लोक कसे उकडून निघत असतील याची कल्पनाच करू नका आणि अशा हालात कष्ट करायचे ! संपादक महाशय, नको ही मुंबई, त्यापेक्षा आपला गाव बरा, असं वाटू लागतं. पण ही मुंबई आहे मुंबई ! या मुंबईत पैश्यांची आणि इतर मौजमजेची अशी काही नशा चढते की काही विचारू नका. माणूस झोपडपट्टीत राहणं पत्करील पण मुंबई सोडून गावाकडे जाणार नाही.

तर काय सांगत होतो संपादक महाराज, की खरं म्हणजे कंटाळा आला आहे. अहो लिहायचं कशावर ? मुंबईत एवढ्या गोष्टी रोज घडतात आणि आम्ही मात्र आठवड्यातून एकदा उठून वैशंपायनांना एवढी मते पडली, नाईक असे म्हणाले आणि ठाकऱ्यांनी तसं केलं असं काहीतरी चोथा मजकूर खरडत बसायचा ! आता परवाचंच सांगतो.

भर दुपारी डोळे अर्धवट मिटून, डुलक्या घेत, भारतीय रेल्वेच्या थर्डक्लासची बाके आमच्या घामाने पवित्र करीत एका उपनगरापासून बोरीबंदरपर्यंतचा १५ मैलांचा प्रवास पार केला. घाम पुशीत पुशीत अर्ध्या मैलाची पायपीट करून मुंबईतल्या एका मोठ्या हॉटेलच्या दाराशी आलो. आम्ही घामानं, प्रवासानं कोमेजलेले आणि हॉटेलच्या दाराशी तर दारवान मोठ्या रुबाबदार कपड्यात ऐटीत उभा. एकदोनदा कच खाल्ली. पण काम महत्त्वाचं होतं. शेवटी त्याच्या तुच्छता-दर्शक नजरेकडे पूर्ण दुर्लक्ष करून समोरचं मोठं काचेचं दार मीच ढकलून आत प्रवेश केला.

आत एकदम सीन ट्रान्स्फर. वातानुकूलित सज्जे, अर्धवट दिसेल न दिसेल असे नाजुक मंद दिवे, पाय वीत वीत रुततील असे मऊ लुसलुशीत गालिचे. बाजूच्या कोपऱ्यातून पाश्चात्य संगीताचे मंजूळ स्वर कानी येतात न येतात आणि भिंतीवर चित्र देखण्या बायांची. काही पूर्ण वस्त्रांकित, काही अर्धवस्त्र तर काही नागड्या. आपण खूष. अंगावरचा घाम अजून वाळला नव्हता. त्यावरच एकदम त्या वातानुकूल हवेचा तीव्र शीतल आघात. थोडं विचित्र वाटलं. पण त्या फिकट उजेडात

आमचा कोमेजला, चुरगळलां चेहरा झाकला गेला हे जरा बरं झालं. इंग्रजीत नमस्कार-चमत्कार. आम्हीं पत्रकार म्हणून समोरची अधिक मऊ खुर्ची वगैरे.

समारंभ होता जरा खाजगी. म्हणजे 'सोशल वर्क' करणाऱ्या एका श्रीमंत कुटुंबाचा सत्कार. मित्रानी आयोजित केलेला. सोशल वर्करचा सत्कार! मग तिथे समाजवादाचे पवाडे गाणाऱ्या सरकारचे प्रतिनिधीं नकोत? होते. एक मंत्रीही येणार होते. आम्हीं बसलो. वेळ होऊन गेली होती. पण आता कुठे तुरळक मंडळी यायला सुरुवात झाली होती. नखशिखांत पाश्चात्त्य पोशाख केलेले पुरुष. तलम वस्त्रे परिधान केलेल्या, चित्रविचित्र लेपने चेहऱ्यावर लावलेल्या, ओठ रंगविलेल्या स्त्रिया हळूहळू या सोशल वर्करच्या सत्कारासाठी हिरीरीने जमू लागल्या. एकेक टेबल अडवू लागल्या. वेटसंची धावपळ सुरू झाली. काट्या चमचाचे आवाज. दूर-वरच्या कीचनमधून न समजणारे वास आणि त्यातच स्त्रियांच्या प्रसाधनाचे सुगंध. थोडा वेळ असा मजेत गेला. आणखी थोडा वेळ गेला. मग कंटाळा यायला लागला तेव्हा समोरच्या भिंतीवरची चित्र काळजीपूर्वक निरखून पाहिली. मग डाव्या उजव्या बाजूच्या भिंतीवरची आणि सगळ्यात शेवटी मागच्या भिंतीवरची.

तेवढ्यात त्या दिवसाचे उत्सवमूर्ती कुटुंब हजर झालं. पन्नाशोवर झुकलेला कुटुंबप्रमुख, त्याच्या दुप्पट आकाराची त्याची धर्मपत्नी आणि नटापट्ट्याच्या बाब-तीत आपल्या वत्सल मातेशी स्पर्धा करणाऱ्या दोन तरुण मुली. टाळ्यांचा गजर. मिठ्या, आलिंगनं, नाजुक चुंबनं. मग काही वेळ मंत्रिमहाशयांची वाट पाहणं. काही वेळ का? बराच वेळ! दरम्यान 'सोशलवर्कर' बाईंनी आणि त्यांच्या मुलीनी आपण करीत असलेल्या सोशलवर्कची माहिती पत्रकारांच्या टेबलाजवळ जाऊन दिली. 'अहो आपल्या देशात किती दारिद्र्य आहे हो! जितकं सोशल वर्क कराल तेवढं थोडंच. आम्ही आमचा सगळा वेळ याच कामाला देतो. विशेषतः अडलेल्या बायांना धीर देणं, त्यांना हॉस्पिटलमध्ये अॅडमिशन मिळवून देणं, वेळ-प्रसगो त्याना आर्थिक मदत करणं, टाकलेल्या बायांच्या भावनिक अडचणी सोडवणं वगैरे-'

'आतापर्यंत एकूण किती बायांना मदत केलीत आपण आणि किती पैसे खर्च केलेत एकूण?' एका मूर्ख वार्ताहराचा प्रश्न. लेकाचा अगदीच नवीन दिसत होता. त्या कुटुंबानं स्वतःचीच एक संस्था बनवून तिला एक मोठं भव्य नाव दिलं होतं. त्या संस्थेचा वाढदिवस. त्यानिमित्त हा भव्य सत्कार. हे मला तेव्हा कळलं.

'अं ऽऽ तसा काही नेमका आकडा सांगता येणार नाही. पण कितीतरी लोकांना आम्ही मदत केली. अं ऽऽ मम्मी तू सांग ना त्या बाईची गोष्ट...'

'हो खरंच बरी आठवण केली. किनई एक बाई होती. खूप आजारी होती बाँबे हॉस्पिटलमध्ये. मी रोज त्या हॉस्पिटलमध्ये जाऊन बायांना धीर देत असे. त्या दिवशी ती बाई फार फार आजारी होती. इतकी की ती म्हणत होती मी मरतेच; पण मी तिला धीर दिला. म्हटलं तू काही मरणार नाही. मी आहे. आणि तिचा

हात धरून त्या रात्री तीन तास बसून राहिले तिला धीर देत. आणि ती बाई जगली. आता ती माझे उपकार मानते...' बाई गहिवरल्या. पुढे म्हणाल्या, '...अहो अशा कितीतरी केसेस असतात. पण पुरेसे सोशल वर्कर्स पुढे येत नाहीत. फंड्स् नसतात. आम्ही तर सगळा आमचा खाजगी खर्च करतो. आमच्या संस्थेला डोनेशन्स कुठेत...' वगैरे वगैरे. हे सगळ इंग्रजीत.

थोड्या वेळाने मंत्रिमहोदय अवतीर्ण झालं. पुन्हा टाळ्यांचा गजर. काही गोड गाणी. मध्ये एका नाजुक पेल्यातून कुठले तरी गोड थंड पेय आले. वर कसली तरी हिरवी पानं होती. तोंडातल्या तोंडात अ‍ॅनालिसीस केला तेव्हा कळलं की ते दूध आणि मधाचं मंद द्रावण आहे, त्यात थोडा तुळशीपाल्याचा अर्क टाकला आहे, आणि वर जी हिरवी पानं दिसताहेत ती चक्क तुळशीची आहेत. मनातल्या मनात म्हटलं, 'कमाल आहे. आपल्या तुळशीचा असा उपयोग! घरी प्रयोग केला पाहिजे.'

पाच-सात भाषणं झाली. कुटुंबाची यथेच्छ स्तुती करणारी. नंतर मंत्रिमहोदयांचं भाषण झालं. 'आपल्या देशाला अशाच सोशल वर्कर्सची गरज आहे. किंबहुना अशा सोशल वर्कर्समुळेच आपला देश टिकला आहे...वगैरे! नंतर खाणं. भरपूर. त्या दिवशी असा यथेच्छ पुख्खा झोडला म्हणता संपादक महाशय! आम्ही एकदम तृप्त होऊन बाहेर पडलो. म्हटलं, परमेश्वरा, सगळे सोशल वर्कर्स असेच उदार असू दे–

तेव्हा संपादक महाशय, मी काय सांगत होतो की मला कंटाळा आलाय तो या गोष्टीचा की मुंबईत एवढे अर्थपूर्ण समारंभ घडत असतानां आपण फालतू पोलिटिक्सवर काय म्हणून लिहायचं. असे कितीतरी सोशल वर्कर्स मुंबईत मलबार हिल, कुलाबा, मरीन लाईन्स, पेडर रोड, खंबाला हिल वगैरे भागात आहेत की त्यांच्यामुळेच आज आपल्या समाजाचा गाडा सुरळीत चालू आहे.

जाता जाता जाता आणखी एक उदात्त उदाहरण देतो. वर्षापूर्वीची गोष्ट. देखावा असाच वर वर्णन केल्यासारखा. फक्त ती होती पत्रकार परिषद. 'सोशल वर्क' करणारे मोठे आंतरराष्ट्रीय क्लब्स् असतात ना. त्यापैकीच एका क्लबने ती अरेंज केली होती. क्लबचे बडे बडे अधिकारी हजर होते. ही जेवणाची पत्रकार परिषद होती. 'डिनर प्रेस कॉन्फरन्स.' मी फारसं वर्णन करणार नाही. पण त्या दिवशी ज्या तऱ्हेचं डिनर होतं तशा डिनरला त्या हॉटेलमध्ये माणशी तेहतीस रुपये पडतात म्हणे. म्हणजे औदार्याची कमाल की नाही. तर मुद्याची गोष्ट ही की त्या परिषदेत क्लबच्या एका बड्या अधिकाऱ्याने जेवणानंतर एक महत्त्वाची घोषणा केली. समारंभाचे इतर सटर फटर वर्णन न करता आणि भाषणातील इतर मुद्दे न देता मी फक्त काही वाक्य देतो, 'मित्र हो, गेल्या वर्षी कोयनेला झालेल्या भूकंपामुळे आम्हाला अत्यंत दुःख झाले. कोयनेच्या भूकंपपीडित बांधवांना मदत करण्याच्या हेतुने आम्ही एक फाटकसरीचा कार्यक्रम आखला. मोठमोठ्या

अलिशान हॉटेल्समध्ये आम्ही 'गाला डिनर्स' देतो. त्याऐवजी आम्ही साधी 'फ्रूगल डिनर्स' दिलीत. मोठया फोर कोर्स सर्व्हिस लंचेसच्या ऐवजी बफे लंचेस दिलीत इतकेच नव्हे तर काही पार्टीजच्या प्रसगी तर आम्ही स्वीट डिशेससुद्धा सर्व्ह केल्या नाहीत. या अत्यंत काटकसरीच्या कार्यक्रमामुळे गेल्या वर्षात आमच्या पार्टीजचा खर्च जो तेवीस हजारावर होतो तो केवळ साडेएकोणीस हजार रुपये झाला. या कार्यक्रमातून वाचलेले साडेतीन हजार रुपये आम्ही आमची अल्पशी मदत म्हणून कोयना भूकप पीडितांना जाहीर करीत आहोत –' टाळयांचा मिनिट-भर बेहोश गजर. ही घोषणा करताना त्या अधिकाऱ्यांचा कठ दाटून आला होता. पण खरं सागतो संपादक महाशय, मला तर अश्रूही आवरता आले नाहीत. केवढा दिव्य त्याग ! कोण ही थोर समाजसेवेची परंपरा !

आता तुम्ही म्हणाल सपादक महाशय की मी जरा फुगवून सांगतो आहे. एवढया मोठया घटना घडत असताना वर्तमानपत्रे त्याची दखल घेत नाहीत आणि मीच आपला तुम्हाला काहीतरी सागतो आहे. घेतात, वर्तमानपत्रेही दखल घेतात. पण वर्तमानपत्रे विकृत असतात. एवढया मोठया घटना. पण त्या कुठल्यातरी कोपऱ्यात एक दोन परिच्छेदात उडविल्या जातात. 'अमुक तमुक क्लबने अमक्या तमक्या कार्याला एवढी देणगी जाहीर केली. वगैरे...' पण या देणगीच्या मागे किती लोकांचा त्याग होता, कितीकांनी कसे कष्ट सोसले याची कुणाला कल्पना येत नाही. पण हा नवा जर्नालिझम आहे ! काय करणार ! आणि हीच वर्तमानपत्रं कोणत्या बातम्या ठळकपणे छापतात माहिती आहे ? अशाच एका मलबार हिलवर समाजसेवा करणाऱ्या सस्थेने १९६२–६३ साली काही रक्कम संरक्षण निधीसाठी जमवून सरकारकडे दिली होती. सरकारकडे दिलेला चेक कुठेतरी फाईलीत पडून राहिला आणि सहा-सात वर्षे कॅशच केला गेला नाही. आपला चेक कॅश केला गेला नाही आणि रक्कम तर त्या संस्थेच्याच नावावर बँकेत पडून होती. म्हणजे रकमेचा काहीच उपयोग होत नव्हता. म्हणून त्या सस्थेच्या काही निष्पाप कार्यकर्त्यांनी ती रक्कम बँकेतून काढली. आणि आपल्या काही खाजगी कामासाठी वापरली. आता रक्कम नुसती पडून होती. कारण चेक कॅशच केला नव्हता. तेव्हा ती पडून राहण्यापेक्षा वापरणे चागले नाही का ? पण पुढे सरकारने १९६८–६९ मध्ये चेक वटविण्याचा प्रयत्न केला तेव्हा चेक परत आला. कारण बँकेत रक्कमच शिल्लक उरली नव्हती. झालं. बोंबाबोंब ! विधानसभेत प्रश्नोत्तरं, वर्तमानपत्रात ठळक बातम्या, टीका वगैरे. म्हणजे आहे की नाही खासा न्याय. त्यांनी रक्कम जमवून दिली त्याचे काहीच नाही. पुढेही जेव्हा कळलं की चेक सरकारला परत गेला तेव्हा काही महिन्यानी रक्कम भरली गेली. पण कोण बोंबाबोंब !

तेव्हा सपादक महाशय मी सांगत होतो ते हे की मला कटाळा आलाय तो या

( पृष्ठ ५९ वर )

येत्या बुधवारी म्हणजे २२ एप्रिलला, बोल्शेव्हिक क्रांतीच्या जनकाची—लेनिनची—जन्मशताब्दी सर्वत्र साजरी होत आहे. त्यानिमित्ताने त्याच्या जीवनकार्यासंबंधी हे त्रोटक विवेचन...

# विसाव्या शतकाला हादरा देणारे निर्धारी व्यक्तिमत्त्व

वि. स. वाळिंबे

व्यक्तीच्या जीवनात काय किंवा राष्ट्राच्या जीवनात काय, इतिहासदत्त संधी एकदाच येत असते आणि या संधीवर स्वार होऊन, इतिहासाच्या हातात हात घालून वाटचाल करण्याचे धैर्य जे कोणी दाखवतात तेच इतिहासावर आपली जरबीळ मुद्रा कोरण्याच्या कार्यात यशस्वी होतात. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभ-काळात हिटलरच्या रट्टयांनी पश्चिम युरोप बेजार झालेला असताना आणि आता केव्हाही त्याची राक्षसी पावले आपल्या भूमीवर उमटू शकतील या शंकेने ब्रिटन धास्तावलेले असताना, प्रधानमंत्रीपदावर आरुढ होण्याचे राजेसाहेबांचे म्हणजेच पर्यायाने आपल्या देशबांधवांचे निमंत्रण स्वीकारताना विन्स्टन चर्चिल यांनी हीच धडाडी दाखविली होती आणि त्यामुळेच 'ब्रिटनचा युद्धकालिन भाग्यविधाता' असा इतिहासाने त्यांचा गौरव केला. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटन क्षीण झालेले आहे आणि त्यामुळे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न फार काळ भिजत ठेवणे ब्रिटिश राज्यकर्त्यांना शक्य होणार नाही हे आढळून येताच पं. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या राजकीय गुरूला—महात्मा गांधी यांना—बाजूला सारून प्रथम वेव्हेल यांच्याशी आणि नंतर माऊंटबॅटन यांच्याशी फाळणीच्या वाटाघाटी केल्या आणि स्वतंत्र भारताच्या शिल्पकाराची भूमिका स्वत:कडे घेतली.

इतिहासाचा आदेश ओळखण्याचे कर्तृत्व आणि कसब म्हणतात ते हेच. लेनिन-लाही इतिहासाचे असेच भान होते हे त्याच्या जीवनग्रंथाची पाने चाळली की सहज ध्यानात येते. त्यादृष्टीने १७ मार्च १९१७ हा दिवस अतिशय निर्णायक म्हटला पाहिजे. दोन दिवसांपूर्वीच रशियामध्ये झारशाही नष्ट झालेली होती. त्यावेळी

लेनिन झुरिक येथे रहात असल्यामुळे त्याला ही वार्ता ताबडतोब कळू शकली नाही. झारशाही इतक्या लवकर – किंबहुना आपल्या डोळयादेखत – नष्ट होईल अशी लेनिनला मुळीच आशा नव्हती. परंतु तसे घडले होते. १७ मार्चच्या सकाळी ब्रोन्स्की लेनिनकडे धावत धावत येऊन त्याला सांगत होता –' कॉम्रेड, रशियात क्रांती झाली असून झारशाही नष्ट झाली आहे.'

'छे, काहीतरी काय सांगतोस ? एवढयात क्रांती कशी होईल ?' – लेनिन म्हणाला.

ब्रोन्स्कीने लेनिनपुढे त्या दिवशीचे वर्तमानपत्र ठेवले तेव्हा कोठे तो म्हणतो ते खरे आहे याबद्दल लेनिनची खात्री झाली. आणि त्यानंतर लेनिनने जे उद्‌गार काढले ते त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. झारशाही नष्ट झाल्याची वार्ता वाचताच लेनिन तात्काळ उद्‌गारला, 'आता आपल्याला शक्य तितक्या लवकर पेट्रोगाडमध्ये पोचायला हवे. अनायासे एवढी चांगली संधी निर्माण झालेली असताना आपल्याला स्वस्थ बसून चालणार नाही.'

त्यानंतर लेनिन रशियाला परतण्याच्या तयारीला लागला. परंतु त्यावेळी पहिले महायुद्ध भरास आलेले असल्यामुळे पेट्रोग्राडला पोचणे सहजासहजी शक्य होणार नाही हेही त्या चतुर क्रांतिकारकाला माहित होते. जर्मनीसारख्या रशियाच्या शत्रुराष्ट्राची मदत घेतली तरच आपल्याला हा प्रवास करता येईल हे त्याला जाणवले. त्याबरोबरच त्याला हेही माहित होते की आपण जर्मनीच्या मदतीने हा प्रवास केला तर शत्रुराष्ट्राचा हस्तक म्हणून रशियात आपली संभावना करण्याची संधी आपले विरोधक दवडणार नाहीत. त्याचप्रमाणे त्याला हेही ठाऊक होते की रशियातील नव्या सरकारलाही आपण नकोसे आहोत. त्यामुळे कदाचित हे नवे सरकार आपल्याला फासावरही चढवील.

## दोनच पर्याय

हे सारे धोके पूर्णपणे माहित असूनही जर्मनीच्या सहाय्याने लेनिनने बंद आगगाडीतून खडतर प्रवास केला आणि अनेक पहारे आणि चौक्या चुकवत तो पेट्रोग्राडमधल्या फिनलंड स्टेशनवर उतरला. या प्रवासात तो आपल्या सहकाऱ्यांना एकसारखे सांगत होता – 'आपल्यासमोर आता दोनच पर्याय आहेत. एक तर सिंहासन किंवा फाशीचा खांब.'

अस्सल क्रांतिकारकाची अशरण वृत्ती आणि परिस्थितीचे वारे कोणत्या दिशेने वहात आहेत हे ओळखण्याचे राजकीय नेत्याचे चातुर्य या सहसा एकत्र न आढळणाऱ्या प्रवृत्ती लेनिनच्या व्यक्तिमत्त्वात साकार झालेल्या होत्या. लेनिन हा केवळ सावध राजकीय कार्यकर्ता असता तर त्याने हे असले साहस मुळीच केले नसते. ज्या बोल्शेव्हिक क्रांतीचा आपण ध्यास घेतला आहे ती क्रांती साकार करण्याची

( पृष्ठ ६१ वर )

# विचार धारे

समीर

## ▫ लाल चीनमधील अंतःप्रवाह

गेली चाळीस वर्षे सातत्याने चीनचे सूक्ष्मपणे निरीक्षण करून आता चीनवरील तज्ज्ञ म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेले पश्चिम जर्मन लेखक व पत्रकार डॉ. क्लॉज मेनर्ट हे नुकतेच दिल्लीला येऊन गेले. त्या वेळी येथल्या प्रेस क्लब-मधील प्रश्नोत्तरीत व इतरत्र पत्रकाराशी बोलताना त्यांनी लाल चीनमधील वैचारिक अत प्रवाहावर व चीनसंबधी इतर राजकीय प्रश्नावर पुढील मर्मग्राहक विचार प्रकट केले.

चीनची युद्धपिपासा : येत्या दशकात चीन दक्षिण आशियात काही लष्करी दडेली करील असे वाटत नाही. याचे एक कारण म्हणजे चिनी नेत्याचे बहुतेक सर्व लक्ष अतर्गत समस्या सोडविण्यात गुतेल. अतर्गत प्रश्नांकडून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी लढाईच्या गोष्टी करण्याचे तत्र आता उपयोगी पडत नाही, कारण आता जोपर्यंत प्रत्यक्ष लढाई सुरू होत नाही तोपर्यंत लढाईच्या गोष्टीना महत्त्व मिळत नाही.

चीनने १९६२ साली भारतावर का आक्रमण केले हे अजूनही कोडे आहे. त्याची चार कारणे असू शकतील : १. सिलोनला जाण्यापूर्वी नेहरू पालम विमान-तळावर जे बोलले त्याचा चीनला राग आला असेल. २. चीनने पादाक्रांत केलेला प्रदेश खरोखरीच आपला आहे असे चिनी नेत्याना वाटत असेल. ३. अचानक टोला हाणून व मग स्वखुषीने माघारी जाऊन आशिया व आफ्रिकेवर छाप पाडण्याचा चीनचा हेतु असेल. ४. भारताला सरक्षणावर अधिक खर्च करायला भाग पाडून भारताच्या आर्थिक विकासात अडथळा आणण्याचा चिनी नेत्याचा हेतु असेल. पण आशिया व आफ्रिकेवर काही छाप पडली असेलच तर ती 'सांस्कृ-तिक क्राती 'मुळे नष्ट झाली आहे.

चीन-पाकिस्तान मैत्री : या दोन देशात खरी मैत्री नाही. भारताशी शत्रुत्व हाच त्यांच्या वाढत्या मैत्रीचा मुख्य आधार आहे. या दोन्हीपैकी कुठल्याही देशाशी भारताचे सबध सुधारले तर चीन-पाकिस्तान संबधात आमूलाग्र फरक पडेल.

चीन-रशिया वैमनस्य : या दोन प्रबळ साम्यवादी देशामधील वैमनस्याचे एक मूलभूत कारण म्हणजे साम्यवादाबद्दलच्या त्याच्या धारणेतला फरक. परिस्थिती बदलण्यासाठी मानवी स्वभाव बदलला पाहिजे असे चिनी मत आहे, तर मानवी स्वभाव बदलण्यासाठी परिस्थिती बदलली पाहिजे असे रशियन मत आहे. चीनचे

रशियावर पुढील सर्वसाधारण आरोप आहेत : १. रशियाने साम्यवादाचा मार्ग सोडला आहे. २. रशियाने समाजात उत्पन्नाच्या आधारावर वर्ग पाडले आहेत. ३. रशियातील आत्यंतिक नोकरशाही समाजवादाशी व साम्यवादाशी विसंगत आहे. ४. १९५९ साली क्रुश्चेव्हने अमेरिकेला भेट दिल्यापासून रशियाने अमेरिकेशी संगनमत केले आहे.

माओच्या मते रशियाने वैज्ञानिक प्रगती बरीच केली आहे व अगदी गगनाला गवसणी घातली आहे खरी पण रशियात साम्यवाद कोठे आहे? आधी मानवी मनाशी मुकाबला केला पाहिजे, परिस्थितीशी नव्हे. पण माओला हवा तेवढा बदल तो मानवी स्वभावात घडवून आणू शकणार नाही.

उलट रशियन तज्ज्ञांनी माओवादाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे, पण त्यात त्यांना फारसे यश आलेले नाही. ते म्हणतात, माओ अराजकतावादी आहे, व मार्क्स अराजकाच्या विरुद्ध होता, तेव्हा माओ मार्क्सविरोधी आहे. परंतु 'अराजकता मुर्दाबाद' अशा घोषणा चीनमध्येही होतात. चिनी ट्रॉट्स्कीला साम्यवाद-द्रोही समजतात, पण रशियनांना चीनमध्ये ट्रॉट्स्कीवादाचे पुनरुत्थान झाल्यासारखे वाटते. ट्रॉट्स्की व माओ हे दोघेही 'सतत क्रांती'चे पुरस्कर्ते असल्याने माओ ट्रॉट्स्कीवादी आहे असे रशियनांना वाटते, पण दोघांची सतत क्रांतीची कल्पना सारखी नाही. शिवाय युद्ध काही फारसे भयकर नसते हे माओचे विधान ट्रॉट्स्कीवादी नाही.

पण रशियन तज्ज्ञांनी मांडलेले काही मुद्दे महत्त्वाचे आहेत. त्यातला पहिला म्हणजे माओवाद हा मुख्यत्वे शेतकऱ्याचा आहे, पण कामगार व शहरी बुद्धिजीवी वर्गाशिवाय साम्यवादी चळवळ चालू शकत नाही. दुसरा मुद्दा म्हणजे माओचा 'चिनीपणा.' याचा अर्थ माओवादाची मुळे वाटतात त्यापेक्षा खोल आहेत. चीनच्या इतिहासात माओची मुळे खरोखरीच खोल रुजलेली असतील व अडीच हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या तत्त्वज्ञ कन्फूशियसपेक्षाही आपला प्रभाव चिनी मनावर अधिक पडावा असा माओचा निश्चय असेल तर माओच्या पश्चातही चिनी परिस्थितीत बदल होणार नाही.

माओनंतर काय ? : माओनंतर चीनचे रशियाशी असलेले वैमनस्य कमी होईल, पण दोन साम्यवादी गट नेहमीच राहतील. माओनंतर लिन् प्याओ, चाऊ व सौ. माओ यांच्यात सर्वाधिकारित्वासाठी चुरस होईल, पण सशस्त्र सामना होण्याची शक्यता नाही. सुरुवातीला लिन् प्याओ व चाऊ संगनमत करून सत्ता हातात ठेवण्याची शक्यता आहे. पण सौ. माओमध्ये माओ-उत्तर काळात सर्वाधिकारित्व सांभाळण्याइतकी कर्तबगारी आहे.

□ □ □

विजय तेंडुलकर

# पंडित महा ग्यानी

मुंबईतल्या षण्मुखानंद सभागाराचे आसमंत माणसांनी फुलून गेले आहे. झब्बा लहेंग्यापासुन आणि जाकीट धोतरापासून रंगीबेरंगी आणि चित्रविचित्र हिप्पी कपड्यांपर्यंत सारे प्रकार यात आहेत. इथे साड्या जमल्या आहेत आणि आत्ता विमानातून उतरून थेट आलेल्या वाटणाऱ्या लेड्याही आहेत. उघड उघड गायनी कळा मिरवणारे कलंदर या गर्दीत हिंडताहेत तसे सुटाचे क्रीज जपत चालणारे लांब कल्ल्यांचे उंची सिकंदर या गर्दीत घोटाळताहेत. कोणी मोटारीतून येताहेत तर कोणी टॅक्स्यातून उतरून बिले चुकती करताहेत. कुणाचे नमस्कार–चमत्कार चालले आहेत आणि कुणी गले मिलाते है.

आतले प्रचंड प्रेक्षागार निम्मेअधिक भरले आहे. उरलेले झपाट्याने भरते आहे. सतारीची एक ध्वनिमुद्रित क्षीणगत पडद्यामागून ऐकवण्यात ऐत आहे. पडदा दुभंगून दूर होतो. विस्तीर्ण रंगमचावर पुढे रित्या टेबलखुर्च्या. त्यामागे एक लंबीचवडी सुशोभित बैठक. त्यामागे खुर्च्यांच्या हारी आणि त्यात नेटके बसलेले स्त्रीपुरुष. प्रेक्षागृहाच्या एका बाजूने रोखून ठेवलेले तीन काळे चलच्चित्रांचे कॅमेरे आता उजळल्या रंगमंचाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसतात. काही फोटोग्राफर्स रंगमंचावर गळ्यातले नाहीतर हातातले कॅमेरे सावरीत मोकळेपणी इकडून तिकडे हिंडत असतात. एक धीट पुढेच येऊन रंगमंचावरून प्रेक्षकांमध्ये नजरेचा फोकस फिरवीत पोटावर कॅमेरा झुलवीत उभा रहातो. वनराजाचे आगमन होण्याआधी बरेच कावळे रानात धीट रूबाबात नाचत फिरत असावेत तसे काहीतरी हे वाटते. मग सगळे कावळे एका विंगेकडे एकवटतात. विंगेत पहात एकसाथ कॅमेरे वर सरसावतात. कॅमेऱ्यांच्या प्रकाशस्रोतांनी प्रेक्षागारातल्या नजरा उगीच चमकतात. विंगेतल्या

कोणाचेतरी फोटो निघत असतात. पुन्हा–पुन्हा. मग कॅमेरे आणि कॅमेरेवाले थांबे मागे सरकू लागतात. वाटेत पुन्हा एकदा छक्‌छक्न प्रकाशस्रोत उमटून जातातच. पाठमोऱ्या चाकणाऱ्या फोटोग्राफर्सच्या पथकामागून आता विंगमधून जमशेद भाभा, डॉ. गजेंद्रगडकर त्यांचा पेटंट निळा सुट घालून, प्रा. बी. आर. देवधर ऑफ इंडियन म्युझिक नाकावरचा घसरता काळा चष्मा न हलवता, आणि मागोमाग किंवा बरोबरीने नर्तकाचा काळाभोर, लांब, कुरळा, विस्कटलेला जिवंत केशसंभार मस्तकी वागविणारे, स्वच्छ झब्बा धोतरातले नि खांद्यावर शालीची घडी सावरणारे गोरेपान पंडित रविशंकर रंगमंचावर टाळ्यांच्या प्रचंड गजरात प्रवेशतात. मागून या आजच्या समारंभाचे संयोजक, नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टसचे सूत्रधार डॉ. नारायण मेनन, समारंभाशी आपला काही संबंध नसल्यासारखे भिडस्तपणे चालत येतात.

सर्व स्थानापन्न होतात. फोटोग्राफर्सचो सेना आता मागे हटून दुसऱ्या विंगेची घोळका करून या स्थानापन्न मंडळीवर आणि त्यातही यातल्या उत्सवमूर्तींवर कॅमेऱ्यांनी नेम धारीत असते.

रंगमंचावरच्या या प्रमुख स्थानापन्नांच्या डाव्या हाताशी आता दुसराच एक घोळका बघता बघता जमतो. रंगीबेरंगी, शिस्तबद्ध घोळका. पुढे चार पाच बाया. यात छोटी तंबोरी घेऊन श्रीमति लक्ष्मी शंकर या आजच्या प्रथितयश गायिका. मागे तीन चार पुरुष गायक. एक पुरुष खाली यांच्या पायाशी मृदंग घेऊन आसन ठोकतो. दुसरा दुसऱ्या बाजूला उभा राहून उभ्या घोळक्याला उद्देशून जादू करावी तसे हातवारे सुरू करतो. हे रेडियोवरचे संगीतकार विजयराघव राव. पहाता पहाता गायन सुरू होते स्वागतपर पद्य. स्वागतपर तरी मधुर, सुरेल, सजीव. गुरुवर रविशंकर तुम पंडित महाग्यानी किंवा असेच काही. रविशंकर मान खाली घालून ऐकतात तर मागल्या रंगमंचावर खुर्च्यांच्या लांबलचक रांगी अडवून बसलेल्या विशेष श्रोत्यांतले सुप्रसिद्ध संगीत अभ्यासक वामनराव देशपांडे इथेही गंभीरपणे समेवर सवयीची दाद देताना सापडतात. लक्ष्मी शंकर बाईंचे गाताना अर्धोन्मीलित व्हाणारे टपोरे डोळे आणि गळ्यातल्या स्वरात दुरवणारी लांबट गोबरी मुद्रा स्वागतपर पद्याला साजते. जोडून नाकाच्या शेंड्याला टेकवलेले हात तेवढे कमी. त्या हातांनी इथे प्रेमाने तंबोरी सावरलेली. (तंबोरी पाहून उगीच एक कल्पना चमकते, ही लक्ष्मीबाईंऐवजी ' नारायण ' मेनन महाशयांच्याच हाती जास्त साजली असती!)

. स्तवन संपते. ते संपण्याचीच वाट पहात असावेत तसे, बटन दाबून ' ऑन ' केल्यासारखे गजेंद्रगडकर एकदम उठून दूरध्वनिक्षेपकाचा ताबा घेतात. आपल्या खोल खर्जातल्या इंग्रजीत सर्व श्रोत्यांच्या वतीने रविशंकर वय वर्षे पन्नास यांना बधाई देतात. शंभर वर्षे जगा असा आशीर्वादही देऊन टाकतात. त्यांना भारताचे

' सतारधारी सगीत राजदूत 'लेखतात. फोटोसाठी चांगल्या पोजेस्ही देतात. गजेंद्र गडकर बसतात आणि त्यांनी खो दिल्याप्रमाणे प्रो. देवधर उठतात. कॉस्मॉपॉलिटन श्रोतृसमुदायासमोर गॉगलआडून चक्क मराठीत भाषणाचा मारा सुरू करतात. प्रथम चकित आणि मग जास्त जास्त तग श्रोतृवर्गात दबले शेरे आणि पृच्छा उठू लागतात. 'इज धिस द सेम क्रिकेटर देवधर?'–एक मध्यमवयस्क पारशी, स्वत.शीच. तर दुसरा शेजारच्याला, ' सालो चोक्कस शिवसेणावालो लागे छे!'

बिचारे देवधरसर रविशंकरांच्या आणि आपल्या जुन्या आठवणी काढतात. विस्मरणातून पलीकडे बसलेल्या रविशंकराशी एकतर्फी सवाद साधत जुनी स्मरणे आवर्जून जागवतात. सितारियाने इतका रियाझ केला पाहिजे, तो असा केला पाहिजे की त्याच्या हातांना डोळे फुटले पाहिजेत हा रविशंकरांच्या परपरेचा आग्रह ते तमाम श्रोत्यांना–अर्थात अस्खलित मिरजकर मराठीत–सुनावतात. ते भाषण संपवणार अशा संशयानेही जोरकस टाळ्या पडतात आणि देवधरसर जणू पडल्या टाळीची आशा मानून नाकावरचा गॉगल वरखाली करीत आसनस्थ होतात.

मग उठतात नारायण मेनन. भाषणाचा आरंभ इंग्रजीत करूनच ते अर्धी लढाई जिंकतात. कॉस्मॉ. श्रोतृवर्ग खूष होऊन जातो. त्यात मेननमहाराजांचा आवाज आर्जवी, मृदु. तेदेखील आठवणीच सांगतात, बी. बी. सी. म्हणजे ब्रिटिश नभोवाणीवर रविशंकरला आपण फार पूर्वी संगीतकार म्हणून नोकरीला बोलावले होते आणि त्याने नकार दिला; पुन्हा आपण ऑल इंडिया रेडियोवर असताना 'ऑफर' दिली ती त्याने स्वीकारली पण अगदी योग्य वेळी त्याने ती नोकरी सोडली. नवथर नर्तक या अवस्थेपासून परिपक्व कलेचा सतारिया ही त्याची प्रगती आपण डोळ्यांनी पाहिली आहे, असे नारायण मेनन सांगतात आणि रविशंकर यांचा पंन्नासावा वाढदिवस याहून मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचा संकल्प सहजपणे जाहीर करून खाली बसतात.

आता कौतुक–समारंभ. हारतुरे. रंगमंचाच्या मागील बाजूच्या खुर्च्यांच्या भरल्या हारीला जाग येते. नारायण मेनन नावे वाचतात; खुर्च्यांतले एकेक लगबगीने येऊन महाग्यानी पंडत रविशकर यांना पुष्पहार घालतात. कोणी लगेच गले लगावतात तर कोणी साधा नमस्कार करतात. कोणी रविबाबूंशी हास्य करतात; कोणी हस्तांदोलन. वैजयंतीमालेचे नाव पुकारले जाते पण खुर्च्यांतून कोणीच उठत नाही. आणि विंगेतून साक्षात स्वरूपसुदरी वैजयंतीमाला पतीराजांसकट हाती हार घेऊन प्रवेशते तेव्हा पितर स्वर्गास गेल्याप्रमाणे श्रोतृवर्गात एकच उत्सव चालतो. सत्कार नक्की कुणाचा याविषयी नवागताचा गोंधळ व्हावा अशी परिस्थिती येते. खेड तालुका मध्यवर्ती विकास मंडळातर्फेही हार आणि तो घेऊन एकजण रविशंकर यांना भेटतो. काही सस्थांची नावे वाचली जातात परतु कोणीच उठत नाही, प्रवेशत नाही. दोन तीन व्यक्ती आणि सस्थांतर्फे नारायण मेननच रविशकरांचो

संभावना करतात. टोपीतून पाखरू काढावे तसे हे गृहस्थ आश्चर्यजनक सहजपणे कधी हार तर कधी शाल तर कधी गुच्छ उभ्या जागी 'उत्पन्न' करतात अ नि निदान लांबून दिसायला दिसते. रविशंकर एकेक हार काढून सहाय्यकाकडे देतात पण शाली लपेटलेल्या मात्र काढीत नाहीत. बघताबघता ते कमालीचे 'शालीन' भासू लागतात ! डाळिंबी रंगाच्या महावस्त्रात तर ते भलतेच 'चिकणे' दिसतात !

हारापुढे हार खाल्लेले पंडित रविशंकर आता आपले चार शब्द बोलण्याला उभे रहातात. मधुर स्वर, नम्र शब्द. अकृत्रिम बोलणे. ते म्हणतात, या प्रसंगी बोलणंच सुचत नाही. मी काय बोलणार ? पन्नाशीला आलो. हे बरे झाले की वाईट ? कोण जाणे. हा सिंहावलोकनाचा क्षण आहे. आपण माझ्यावर करीत आलात त्या प्रेमाचा उतराई कसा होऊ ? मागणे एकच : आपल्या शुभेच्छा हव्यात; या रविशंकरला आयुष्याच्या भैरवीपर्यंत आपली आणि कलेची सेवा करीत कार्यमग्न जगता यावे म्हणून. हे आयुष्य फार फार कमी आहे. खूप करण्याचे मनात आहे त्यातले सगळे नाही तरी बरेच करून व्हावे, यापरतो आज दुसरी आणखी कसली इच्छा करू ?

टाळ्यांचा कर्णकटू कडकडाट, आणि मध्यंतर. पडदा. गलका. गोंधळ.

मध्यंतरातले सर्वांचे सव करून संपते तरी मध्यंतर आपले चालूच ! शेवटी श्रोते टाळ्यांचा सपाटा लावतात तो पडदा उघडल्यावरच थांबतो. आणि रंगमंचावर आसने-खुर्च्या वजा होऊन केवळ बैठक राहिलेली. तीवर साथवाले; आणि मधोमध स्टार परफॉर्मर्स. एक राक्षसपार्टी; खेळण्यांप्रमाणे तबला — डग्गा पुढ्यात मांडून बसलेला; तर दुसरा देवपार्टी; साथीच्या तंबोऱ्याचे तराफे मिळून तारा सुरात आणू बघणारा. राक्षसपार्टी मशहूर तबलिये अल्लारखा. आणि देवपार्टी अर्थातच महाग्यानी पंडीत रविशंकरमहाराज.

पूरिया कल्याणने वादनाला आरंभ होतो. तेच, 'कलेचे डोळे' फुटलेल्या तरबेज हाताचे नेहमीचे कसब; ताणलेल्या तंतूंतून पहिल्या सरीच्या टप्पोऱ्या दाणेदार थेंबासारखे ओलेओले गहिरे स्वरबंध पिळून काढणारे. या स्वरांचे सुरेल वाहते ओघळ निर्माण करणारे. या ओघळांचे गतीमान आकृतिबंध उठविणारे, ते पुसटून टाकून नव्या स्वरांकडे धावणारे. पाहता पाहता हात वेग घेतात. झुलत्या केसांचे उस्ताद अल्लारखा या वेगाचे पळते हिशेब आपल्या तबल्या–डग्ग्यावर मांडून दाखवू लागतात. रविशंकराच्या महाग्यानी बोटांतून संगीत एखाद्या जिवंत स्त्रोतासारखे स्रवत राहते. त्यानंतर खमाज सुरू होतो. तीच सफाई. तोच स्वरांच्या चौफेर उधळत्या कळपांवर शांत हुकूमत ठेवणारा तपस्वी आत्मविश्वास. तीच श्रोत्यांची प्रेमादराने भरलेली नजर. तेच सुखावणारे, सुखावून घेणारे एकाग्र कान. हलत्या डुलत्या माना. दाद म्हणून मधूनच उठणारा हुंकार. सतारीसारखा, एक लोकप्रिय कलावंत आणि त्याचे चहाते यांच्याही तरफा कशा एकजीव जमल्या

आहेत! समाज संपतो. आता निरोपाची एक मिश्रधून येते. शास्त्राचे करडे रीतीरिवाज ओलांडून एका प्रौढ प्रतिभेने केलेला मनमोकळा शृंगार. पदोपदी अनपेक्षिताने मुसमुसलेला. नाजूक मोहक विभ्रमांनी सामान्य श्रोत्यालाही सुखावणारा. अनोळख्या खुणा आणि संकेतांची अगणित रहस्ये वापविणारा. आणि शेवटी मल्लार-खोच्या तबल्याशी मात्रांची एक मत्त क्रीडा मांडणारा. सभागार दणाणून जाते—स्वरांनी, ताळांनी, टाळ्यांनी. पुन्हा—पुन्हा. पुन्हा...

आणि अपरिहार्य अखेर येतेच. स्वर-मात्रांचे वादळ विरते. काहीसे श्रांत रविशंकर वय वर्षे पन्नास हातची सतार हलकेच दूर करून उठतात. आपल्या श्रोत्यांना पुनः पुन्हा अभिवादन करतात.

टाळ्यांच्या कडकडाटात पडदा येतो. प्रचंड गर्दी बाहेर पडू लागते.

बाहेर एक माहीतगार एका चहात्याला सांगताना ऐकू येतो, नो, ही इज नॉट स्टेइंग. (नाही, राहणार नाहीत.) टुमॉरो कलकत्ता. डेआफ्टर टुमॉरो मद्रास—कोलंबो—अँड फ्रॉम कोलंबो टु—(उद्या कलकत्त्याला निघाले. परवा मद्रास. तिथून कोलंबो नि कोलंबोहून सरळ—)

ऐकणारा पुढचे न ऐकता चालू लागत म्हणतो, येस, अमेरिका अगेन! (पुन्हा अमेरिकेत!) ही इज नॉट लाइक इंडिया नाऊ. (भारत त्याला रुचेनासा झालाय.) ही लाइक्स अमेरिका! (अमेरिका आवडते.) आणि स्वतःशीच तो काहीतरी पुटपुटत जातो. काय कुणास ठाऊक!

काय कुणास ठाऊक...

□ □ □


# मुजऱ्याचे मानकरी

ब. मो. पुरंदरे

तीन रुपये

राजहंस प्रकाशन

## ◻ न 'भुत्तो' न भविष्यति !

**A** cruel story runs on wheels & every hand oils the wheels as they run...दुष्ट हकिगती चाकांवर ठेवल्यासारख्या पळत असतात आणि प्रत्येकजण त्या चाकांवर वंगण ओतीत असतो. असे जर नसते, तर लालबहादुर शास्त्रींचा खून झाला असे लोकसभेत छातीठोकपणे खासदारांनी सांगितले असते काय ? निजलिंगप्पा कांग्रेसचे त्रिलोचन सिंग यानी सांगितले–

'शास्त्री हे अजातशत्रू होते. त्यांचा मृतदेह काळाठिक्कर पडला होता. नैसर्गिक मृत्यू आला असताना, असे का व्हावे हा प्रश्न मला तेव्हाच पडला होता. परंतु आता ज्या गोष्टी उजेडात आल्या, त्यावरून शास्त्रींचा खूनच झाला असावा असे वाटते. शास्त्रींच्या बिछान्याजवळ टेलिफोन नव्हता की नोकराला बोलावण्यासाठी घंटाही नव्हती. त्यांना चांगले शाकाहारी जेवणही आदल्या रात्री मिळू शकले नाही. त्यांच्याबरोबरच्या किती मंडळींनी, त्या रात्री व्होडका पिऊन ताणून दिलेली होती हे समजले पाहिजे ! शास्त्रींना 'इन्ट्रामस्क्यूलर' इंजेक्शन, हृदयाचे ठोके थांबल्यानंतर का दिले गेले ? माझा असा आरोप आहे की मृत्यूनतर शास्त्रींना इजेक्शन देण्यात आले. ज्या सोविएट स्त्री डॉक्टरीणबाईंनी शास्त्रींना नतर तपासले, त्यांनी शास्त्रींच्या वैद्यकीय तपासणीच्या सर्टिफिकेटवर सही करण्याचे का नाकारले ? झोपण्यापूर्वी शास्त्री दूध घेत असत. त्यांचा नेहमीचा स्वैपाकी व नोकर जानमहंमद हा त्या दिवशी दूध देण्यासाठी का आला नाही ? दूध पिताच शास्त्री गतप्राण झाले.'

श्री. सिंग यांचे थोडक्यात म्हणणे, की शास्त्रींवर विषप्रयोग झाला आणि म्हणूनच त्यांच्या प्रेताची उत्तरीय तपासणी न करता त्यांचा अंत्यविधी उरकण्यात आला ! आम्हाला हे कळत नाही की मोरारजीआदी निजलिंगप्पांचे सहोदर, इंदिरा मंत्रिमंडळात असेपर्यंत, श्री. सिंग हे याबाबतीत तोंडात गुळणी घेऊन का बसले ? श्री. सिंग यांच्या हकिगतीत श्री. राजनारायण या संसोपा सदस्यानी आणखी मसाला घातला–

'शास्त्रींच्या थर्मासमधील पेयाची तपासणी का केली नाही ? तो थर्मास कुठे आहे ? शास्त्रींची दैनंदिनी बेपत्ता का झाली ?'

सरकारला किती बरे अडचणीत टाकणारे हे प्रश्न ! वस्तुतः सर्वच थोर माणसांच्या मृत्यूचे गूढ होत असते. लालबहादूर शास्त्री हे काही असे पहिले आहेत

की काय ? तरी एक बरे आहे की शास्त्री निधन पावले याबद्दलच सर्वांची खात्री आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर विषप्रयोग झाल्याचे अलीकडील पुराव्यावरून श्री. रणजीत देसाई म्हणतात. परतु त्यांना अंथरुणावर मृत्यु आला असे श्री. बाबासाहेब पुरंदरे म्हणतात. म्हणजे काय लगेच छत्रपतींच्या मृत्यूची चौकशी सुरू करायची की काय ? देसाई भक्तांनी 'श्रीमान योगी' वाचावे, पुरंदरे भक्तांनी 'राजा शिवछत्रपती' वाचावे. काही बिघडत नाही. गृहमंत्री यशवंतराव चव्हाण भक्तांनी लालबहादुर हृदयक्रिया बंद पडून गेले असे समजावे, निजलिंगप्पा काँग्रेस-वाले, संसोपा, जनसंघ, या मंडळींनी त्यांचा खून झाला असे समजावे. गृहमंत्र्यांनी चौकशीस नकार दिला यात वावगे काहीच नाही ! त्यांनी चौकशी तरी कसली कसली करायची ? इंदिरा गांधींना धमकीची पत्रे आली त्याची चौकशी चालू आहे. गांधी खुनाची चौकशी चालू आहे. उपाध्यायांच्या खुनाची चौकशी चालू आहे. यातून शेवटी हाती बावनकशी काहीही लागत नाही हे तर सर्वांना माहीत आहेच.

अडचण आहे ती शास्त्रींच्या जीवनावर कादंबरी लिहिणाऱ्या श्री. भा. द. खेर यांची ! कथा कुणाची व्यथा कुणा ! गृहमंत्र्यांनी त्यांना मुद्दाम ताश्कंदला पाठवले. कादंबरीकार 'सगळे काही' पाहून आले. कादंबरीत शास्त्री अंथरुणावर अंग टाकीपर्यंत मजकूरही लिहून झालेला आहे. आता मध्येच हे लचांड उपटले ! आम्हाला वाटते लेखकाने दोन कादंबऱ्या लिहाव्या. म्हणजे अंत दोन करावेत ! शास्त्रींचे आणि कादंबरीचे ! एकात शास्त्रींवर विषप्रयोग करावा, आणि दुसरीत त्यांची हृदयक्रिया बंद पाडावी. ज्याला जी कादंबरी हवी असेल ती त्याने घ्यावी, अशी प्रकाशनपूर्व सवलत वाचकांना द्यावी. वाटल्यास विषप्रयोगाच्या कादंबरीची किंमत थोडी जास्त ठेवावी.



विषप्रयोगासंबधी प्रत्यक्ष माहिती मिळवण्यासाठी कादबरीकाराला पुनः ताश्कदला जाणे अवश्य आहे असे आम्हास वाटते. पाकिस्तानचे त्यावेळचे परराष्ट्र-मत्री झुल्फीकारअल्ली भुत्तो हे अधून मधून अशी धमकी देत असतात, की ताश्कंद करारासबंधी त्यांचेपाशी जी 'गुप्त कलमांची' माहिती आहे ती जाहीर झाली, तर जगाला धक्का बसेल! या गुप्त कलमांचा आणि शास्त्रीच्यावर झालेल्या विषप्रयोगाचा काही संबंध असावा, असे आम्हास वाटते. 'अमृतपुत्र' च्या लेखकाला यासाठी पाकिस्तानातही पाठवावे. भुत्तोने जर आपल्याजवळची माहिती भा. द. खेरांना सागितली, तर मराठीतील ही कादबरी 'न भुत्तो न भविष्यति' अशीच ठरेल नाही का?

## □ बेकारी निवारण केंद्र!

श्री. जयप्रकाश नारायण सर्वोदयी, हे अधून मधून फारच सनसनाटी बोलतात. नुकतेच ते म्हणाले—

'तिसरी पंचवार्षिक योजना संपली तेव्हा देशात बेकारांची सख्या १३०,०००० होती. तज्ञ म्हणतात की चौथी पंचवार्षिक योजना संपेल तेव्हा ही संख्या २७०,०००० होईल. हे काय प्लॅनिंग म्हणायचे?'

कित्ती कित्ती 'दिवस' गेल्यानंतर, चौथ्या पंचवार्षिक योजनेचा पाळणा नुकताच हलला. 'प्लॅन जन्मला ग सखे। प्लॅन जन्मला।।' अशा ओव्या सगळया वृत्तपत्राच्या संपादकांनी गायल्या. जरा कुठे बारसे, वाढदिवस असा काही कार्यक्रम असला, की हे सर्वोदयी असे काहीतरी बोलून लोकांना निरुत्साही करतात. स्वतः दाढया वाढवून, पंचे गुडाळून हिंडतात ते हिंडतात, आणि वर इतराना हसू खेळू देत नाहीत.

बरे माणसाने खरे तरी बोलावे की नाही? कोण म्हणतो बेकारी आहे म्हणून? पुण्याचे कॉंग्रेस पुढारी श्री. रंगराव पाटील यानी महिन्याभरापूर्वी पुण्याच्या कॉंग्रेस-भवनात बेकार लोकाची सभा बोलावली होती. बेकार कार्यकर्ते धरून, या सभेला फक्त १६ लोक हजर होते!! 'बेकारी निवारण केंद्र' चालवायलाच १५–१६ जण लागतील! कोण म्हणतो बेकारी वाढत चालली आहे? निदान कॉंग्रेस-वाल्यांत तरी तूर्त बेकारी जवळजवळ सपुष्टात आलेली आहे. इतर पक्षांना, जर बेकारी खरोखरच आहे व ती जावी असे वाटत असेल तर त्यांनी ताबडतोब 'इंदिरा कॉंग्रेस'मध्ये दाखल व्हावे. निदान त्यांच्याशी निवडणूक समझोता करावा. काही बेकार या मार्गाने 'राज्यसभे'पर्यंत पोचलेले आहेत. उगाच विरोधी पक्षात राहून 'बेकारी आहे, बेकारी आहे' म्हणून ओरडत रहाण्यात काय बरे अर्थ आहे? केव्हातरी माणसाला याचा कंटाळा यावा की नाही?

इंदिरा कॉंग्रेस हे देशातील एकमेव खात्रीलायक बेकारी निवारण केंद्र आहे!

—ग्यानबा

# गावगाड्यातील महार

यशवंत पटवर्धन । विलास पतकी

संध्याकाळ होत चाललीय. दूरवरच्या डोंगरघळीतून अंधाराची पालं केव्हाच उतरली आहेत. वाऱ्याच्या एखाद्या झुळकेनं वाळका पालापाचोळा क्षणभर भिरभिरून पुन्हा निश्चल होतोय्. पुढच्या मुक्कामाला जायचंय् आणि म्हणून गावच्या ओढ्यावरच्या पुलावर गाडीची वाट पहात उभे आहोत. समोरच्या कट्ट्यावर गावकरी मंडळी गप्पांचा पट टाकून बसली आहेत. समोरून गावातील प्राथमिक (नवबौद्ध) शिक्षक येत आहेत. शरीर चांगलं कमावलेलं आहे. कुस्तीचं. पीळदार शरीराच्या कौतुकाचं दान गप्पांच्या पदावर टाकलं जातंय्.

'शेतातला रुतलेला नांगरचा फाळ एका हिस्यात काढला होतान् यानं !'

'तांबड्या मातीचं शरीर हाये !'

'अरं पर येड्या, रेडा ओढणारी माणसं ही. येवढी ताकद होवीच यांच्या अंगामंधी'

आणि वावटळ उठली आहे. डोंगरघळीतील अंधाराची पालं आता मनात उतरली आहेत.

महात्मा गांधींनी जुन्या गावगाड्यातील म्हारड्याला हरिजन केलं, परमपूज्य आंबेडकरांनी त्याला बौद्ध केलं–आणि सरकारनं त्यांना बी. सी. केलंय् ! पण गेल्या वीस वर्षात खरोखरच कितपत सामाजिक स्थित्यंतर झालं आहे याचा अदमास घेण्यासाठी वेल्हे तालुक्यात आम्ही हिंडतो आहोत. नवनवीन अनुभव येताहेत आणि ते मनात नैराश्याचं वादळ उठवताहेत.

पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेजमधील
स्थापत्य विभागातील
दोन तरुणांनी लिहिलेला हा लेख.
आपल्या अवतीभवतीचे जग,
समाज
समजावून घेण्याची ही कौतुकास्पद धडपड...

---

दुसरा धर्म पूर्णपणे समजून धर्मांतर केलं तर ते अधिक भिनतं. हे झालं तत्त्वज्ञान; पण अनुभव वेगळाच येतोय्. ज्या समाजानं बौद्ध धर्माची दीक्षा घेतली तो संपूर्णपणे अशिक्षित. त्यामुळे धर्म समजण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जी काही सुशिक्षित मंडळी या समाजात आहेत तीसुद्धा या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊ शकत नाहीत. बौद्ध धर्माची तत्त्वं सांगताना तो 'अंध श्रद्धा ठेवू नका,' म्हणून सांगतो आणि दुसऱ्याच क्षणी 'ही गोष्ट डॉक्टरसाहेबांनी सांगितली आहे. ती चूक असूच कशी असेल?' असा खडा सवाल टाकतो! हिंदु-धर्मातील भिकार, अमानुष रूढीबद्दल तो चिडीनं बोलतो; पण बौद्ध भिक्षु-भिक्षुणींच्या 'त्या' प्रकाराबद्दल 'चालायचंच' म्हणतो.

न समजता केलेलं हे धर्मांतर या समाजाच्या रक्तात इतकं भिनलं आहे की, हिंदू धर्माबद्दल बोलताना त्यांचा संताप अनावर होतो. एका प्राथमिक शिक्षकाशी बोलतानाच हा अनुभव येतो असं नव्हे तर तोच अनुभव एका अशिक्षित स्त्रीशी बोलताना येतो आणि तोच एका सत्तर वर्षाच्या रिटायर्ड मिलिटरीमनशी बोलताना येतो. मनात विचारांचं काहूर उठतं. हे धर्मांतर कडवं कसं? सत्तर ऐंशी टक्के लोकांना बौद्ध धर्माची तत्त्वं माहीत नसताना हे धर्मांतर कमालीचे पट्ट झालंय्. आंबेडकरांच्या कल्पनेपेक्षा यशस्वी झालंय्. आणि याचं कारण एकच दिसतंय्. या धर्मानं त्यांना माणूस म्हणून जगण्याची जिद्द दिलीय. त्यात बौद्ध धर्मतत्त्वांचा भाग कितीसा हे बुद्धच जाणे. पण इतकं मात्र खरं की, हिंदु धर्मात, मिळालेली उपेक्षा

झुगारून मात्र देता आली. बौद्ध धर्मात स्पृश्यास्पृश्यता नाही पण उच्चनीच भेद नाही असं म्हणण्याचं धाष्टर्य मात्र होत नाही.

"सध्याचे देव कोणते?" एका साधा प्रश्न. "आरं राजा, धरम बदलला पंजी काय देवबी बदलत्यात; नाय बा. आरं, आमच्या एका पाववाल्यानं देव फेकून दिलं आन त्याचं पोरगं साप चावून मेलं!" एक उत्तर; "आता 'साहेब' आणि बुद्ध देव हीच आमची दैवतं." दुसरं प्रामाणिक मत; "आमच्या घरात दोघबी सुखानं नांदत्यात!" ही तिसऱ्याची सारवासारव! "धर्म बदलला त्याच वेळी आम्ही आमच्या वाडीतील सर्व देव गोळा केले. दगड पाण्यात टाकले आणि सोन्याचे देव वितळवून धाडीला जेवण दिल. म्हटलं बघू या काय होतंय् ते!" हे एक पुरोगामी, सुशिक्षित मत. पण मग हे 'म्हटलं बघूया काय होतं' कशासाठी? म्हणजे यांच्याही मनातली भीती जात नाही. असो.

देवाला बकरं-कोंबडं कापणं बौद्ध धर्माला मान्य नाही. त्यामुळे "तुम्ही बकरं कोंबडं कापता का?' हा एक प्रश्न. 'आरं धर्म बदलला म्हणजे काय माणूस बदलतो काय?' असा प्रामाणिक जबाब देणारा एखादाच. पण बाकीच्यांचं मात्र "छे, छे, आमचा आता काय संबंध? ते सगळं तेव्हाच गेलं" हे एक पढीव उत्तर. सरळ दिसतय् की हा माणूस मनापासून बोलत नाही म्हणून. मग हा ओढूनताणून आणलेला कडवेपणा कशासाठी? उत्तर सरळ आहे, पूर्वधर्माची चीड.

धर्मांतरानं या पददलित समाजाला माणूस म्हणून जगण्याची जिद्द दिली. पण हा समाज-समूह ज्या समाजात रहात होता त्याच्याशी एकसंध होऊ शकलेला नाही हे कटू सत्य आहे. पूर्वी एका गावात दोन गावे होती. आणि आज? आजही ती तशीच आहेत. एवढंच नव्हे तर ती पूर्वीपेक्षा जास्त वेगळी झाली आहेत, जास्त दूर गेली आहेत. याला कारण तुम्ही-आम्हीच, बहुजनसमाजाची माणसं. जुन्या महारांनी धर्म बदलला, पण आम्ही अजूनही त्यांना महार म्हणूनच वागवितो! गावोगावी हाच अनुभव येतो आहे. वर्तमानपत्रं रोज तेच सांगताहेत. एका शिक्षकाचा हा अनुभव. गावातील शाळा मोडकळीस आली आहे. पण शिक्षक बौद्ध म्हणून देवळात शाळा भरविण्यास परवानगी नाही. म्हणून मग थोडी थोडकी नाही, चांगली दीड वर्ष त्यांना झाडाखाली शाळा भरवावी लागतेय्. स्वताच्या गावापासून १००–१५० मैल दूर आलेल्या शिक्षकाला ही वागणूक! असेच एक शिक्षक. त्यांना गावात रहायला जागा नाही. एक पंचायत सदस्य, गावाच्या तोंडाशी घर बांधायला सक्त विरोध. गोष्टी मारामारीपर्यंत थांबत नाहीत तर त्यांना उभं जाळण्याच्या अवस्थेपर्यंत जातात! यासाठी खेडेगावातील बहुजनसमाजच जबाबदार आहे.

हा समाज बहुधा सर्व गावातून अल्पसंख्याक आहे, म्हणूनच फारसं काही घडत नाही. सर्वसाधारणपणे गावात हरिजनांची वस्ती ५ ते ७ टक्क्यांच्या पुढे नाही.

एखाद्याच गावात त्यांची बऱ्यापैकी वस्ती दिसते आणि ते बहुसंख्य असणं हा प्रकार तर विरळाच. आम्हाला भेटलेल्या शेवटल्या प्रकारातील एका गावात आलेला अनुभव हा एक नमुना आहे.

आम्ही एका पाटलाशी (त्याच गावातील) बोलत आहोत. 'आमच्या गावात पाटीलकी आपल्याच समाजाकडे आहे. कोतवालकीसारखी फालतू कामं आम्ही करत नाही. ती मराठ्यांकडं देतो.' हे विधान ऐकून गंमत वाटते आहे. (अर्थात पाटील ऐवढं मोकळेपणानं बोलतात याला कारण आहे.' आम्ही तुमच्याच जमातीतील आहोत' अशी मारलेली थाप हेच ते कारण होय.) मग पाटील सांगतात, "शिकलेला नसलो, अगठेबहादुर असलो तरी समद्यांच्या तोंडात मारील असं आपलं डोस्कं आहे." त्यांची वाडी जळाली मग त्यांनी २००० रु. प्रत्येकी लगाई म्हणून मिळविले. प्रांत आपलाच असल्यानं इतरांचीं छान जिरविली आणि १०००–११०० रु. त घर पूर्ण कसं केलं आणि सरकारला कसं फसविलं याची रसाळ वर्णनं पाटील करताहेत.

*पण मग आता दोष कुणाचा? की हाच मनुष्यधर्म! आणि आदर्श तरी कोणाचे आहेत यांचेपुढे?*

बदलत्या काळाबरोबर हा समाज बदलत चालला आहे. आपण अस्पृश्य गणले जायला काय कारणे असावीत याचा तो विचार करतो आहे. अस्वच्छता हे एक कारण त्याला पटतंय. पण लगेच मग "आज आमच्यातील जे काहीं स्वच्छ राहतात त्यांनाही अस्पृश्य का मानतात?" हीं व्यथा त्याला जाळते आहे. अस्पृश्य समाजाच्या काही पुढाऱ्यांना जरी हे मान्य नसलं तरी शहरांतून अस्पृश्यता आज झपाट्यानं नाहीशी होत आहे. बहुजन समाज, घरात जरी संस्कार पाळीत असला तरी समाजात समाजविचार म्हणून तो पुरोगामीं बनला आहे. स्वतःच्या गावी गेल्यावर तोच माणूस अस्पृश्यता पाळतो असं या पुढाऱ्यांचं म्हणणं असलं तरीं ती त्याच्या मनातून झपाट्यानं दूर होत आहे हे नाकारण्यात अर्थ नाहीं. 'धर्माच्या' नावाखालीं स्पृश्यास्पृश्यता पाळणं हे आज पांढरपेशा माणसास मागासलेपणाचं वाटत आहे.

समाजातील स्पृश्यास्पृश्यतेला व जातिभेद पसरविण्यास फक्त उच्चवर्णीय समाजच जबाबदार धरला जातो. पण याचं दायित्व सर्व समाजावर आहे हे आपण ध्यानी घेतलं पाहिजे. अस्पृश्य समाजसुद्धा त्याला तितकाच कारणीभूत आहे. हे एक उदाहरण पहा! एक शिक्षक! नवबौद्ध! गावात महाराचं एकच घर! घलिच्छ म्हणून! गावातील चांभारास जेवावयास घालाल का म्हणून विचारलं. तेव्हा नवबौद्ध शिक्षकास स्पष्ट नकार मिळाला. कारण तो चांभारापेक्षा नीच जातीतला! आहे कीं नाहीं!

या समाजाच्या आर्थिक परिस्थितीबद्दल बोलणं म्हणजे कठिण गोष्ट आहे.



बरेचसे
अबोल
असलेले
हंसाबाईंचेहि चरित्र
अत्यंत
बोलके
आहे.

वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन

एका जेवणावर दिवस काढणं ही तर यांना नित्याची गोष्ट आहे. सर्वसाधारणपणे १० प्रतिशत लोकांचे माणशी मासिक उत्पन्न ३० ते ३५ रु. पर्यंत जाते. साधारणपणे ४० प्रतिशत लोक १५ ते ३० रु. त बसतात. आणि उरलेल्यांचं उत्पन्न १० रु. पेक्षाही कमी आहे. खेडेगावात पैसेवाल्या माणसाकडे पुढारीपण जाते. पण असा एकही पुढारी आम्हास भेटला नाही.

न्यूनगंड ही आणखी एक खटकणारी गोष्ट ! इतर समाजानं दाबून, कुजवून टाकलेल्या समाजात अशी भावना असणे हे नवल नव्हे. पण आता ती गेली पाहिजे. धर्मांतरानं यात थोडा बदल झाला आहे. तरीही त्याचा वेग वाढावयास हवा.

कुठंही गेले तरी एक गोष्ट कानावर येते. सर्वच लोक, स्पृश्य आणि अस्पृश्य सुद्धा म्हणतात की, अस्पृश्यता हळूहळू नष्ट होत आहे. पण हा, ' हळूहळू, मात्र जात नाही. तो मनाला क्लेश देतो. हळूहळू सर्व समाजच सुधारत असतो. तुम्ही वेगळं काय करता ? अशी समाजाची आणि स्वतःची फसवणूक का करतात हे लोक ? याला सुधारणा म्हणत नाहीत. सुधारणा वेगवान व जिवंत असावयास हवी. याला उपाय म्हणजे सर्व समाजानं सुधारणेच कंकण हाती बांधावयास हवं. या परिस्थितीत क्रांतिकारक बदल हवा आहे.

बराचसा समाज अजूनही अडाणी, मागासलेला व म्हणून भित्रा आहे. गावात गेल्यानतर ' सर्व समाज एकत्र येऊ द्या व मग तुमच्या प्रश्नाची उत्तरं देऊ ! ' असं उत्तर मिळतं. शिक्षणाचं महत्त्व त्यांना मान्य नाही. गावात शाळा आहे. पण ' वस्ती 'वरील मुल शाळेत जात नाहीत. गावातील इतर मुलंही थोडीच असतात. याला एक कारण म्हणजे त्याना मिळणारं अव्यवहारी शिक्षण. शहरात जर तांत्रिक शिक्षण दिल तर खेडेगावात शेतकी शिक्षण हव. ठोकळेबाज शिक्षण नको. शिक्षणाच्या बाबतीत समाजाच्या डोळयात चाललेली ही धूळफेक ही शरमेची गोष्ट आहे. आज एखाद्या गावात तेथल्या अडाणी लोकांच्या मागणीवरून शाळा दिली म्हणजे आपलं कर्तव्य संपलं असं सरकार मानतं की काय कोणास ठाऊक ! नाहीतर ६ पट, ३ सरासरी हजेरी आणि तेथे २०० रु. प्रतिमास वेतन असणारा शिक्षक, अशा एक दोन नव्हे सात शाळा या तालुक्यात सापडल्या नसत्या.

या समाजातील मुलगे थोडे तरी (?) शाळेत जातात. मुली जातच नाहीत. स्त्रिया अजून घराबाहेर पडलेल्या नाहीत. हे सर्व करण्यासाठी समाजाबाहेरची व्यक्ती ' कलम ' करण्यापेक्षा या समाजातूनच डॉ. आंबेडकरांसारखा महावृक्ष निर्माण व्हावयास हवा. आणि एक गोष्ट येथे प्रकर्षानं जाणवते की, जर असा डॉ. आंबेडकर तयार झाला नाही तर आंबेडकरांच्या नावावर खपविल्या जाणाऱ्या गैरसमजुती लोकांच्या मनातून जाणार नाहीत, राजकीय पक्षांत चाललेली फाटाफूट थांबणार नाही. आजचा प्रत्येक नवबौद्ध शिक्षित तरुण या दृष्टीनं पुढ पाऊल टाकू शकेल. सगळेच काही आंबेडकर होऊ शकणार नाहीत ! तरीपण, ते काम नक्कीच कठ

शकतील. या तरुणाची परिस्थिती आज फार विचित्र आहे. तो स्वतःच्या समाजापासून दूर जातो आणि इतर समाज त्याला आपल्यापासून दूर ठेवतो आहे. ते तरुण शहरी झाले आहेत आणि वरील परिस्थितीमुळे उदासीन आहेत. त्या उदासीनतेला कारण अनेक असतील पण तरीही ती उदासीनता झटकून टाकावयास हवी.

हा प्रश्न किरकोळ मानून चालणार नाही. ही गोष्ट सहज बोलताना एक पुढारी जेव्हा बौद्ध परगण्याची मागणी करतो तेव्हा लगेच पटते. "आणि अशी मागणी आम्ही केली तर काय बिघडलं ? आम्ही काय केले म्हणजे हा प्रश्न सुटेल ? की आम्ही सर्वांनी स्वतःला जाळून घ्याव ?" असे जेव्हा एक शिक्षित तरुण विचारतो तेव्हा त्याचा क्षोभ तर स्पष्टपणे दिसतो, पण या प्रश्नाची तीव्रताही मनात पेटून उठते. ठक्कर बाप्पाची आठवण या प्रसंगी आल्यावाचून रहात नाही. हा आपल्याच महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी. १८९० सालचा. त्यानी घालून दिलेली– 'An engineer is not and cannot be a Massonary builder but has to be the Society builder' ही शिकवण, हा आदर्श आपण डोळयासमोर ठेवू या !

न संपणाऱ्या प्रवासातला हा एक टप्पा संपला आहे ! प्रवासाचं चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं आहे. सशक्त शिक्षक दिसताहेत पण गांवकऱ्यांचं बोलणं त्यांनी ऐकलं असल तर त्यांना काय वाटत असेल याचा विचार मनात येतो आहे. कोणाही सुशिक्षिताचा विश्वास बसणार नाही अशी 'साप चावून मेलेल्या मुलाची' गोष्ट सांगणारे आजोबा दिसताहेत आणि त्याचीच दुसऱ्या बाजूची डॉक्टर आंबेडकरांवरची अतूट श्रद्धा पाहून मन भरून येतं आहे. आपल्या समाजाच्या दुःखाबद्दल आणि इतराच्या क्षुद्र मनःप्रवृत्तीबद्दल भावपूर्ण बोलणारा पण स्वतः मात्र कॉलनीत राहणारा सुशिक्षित दिसतो आहे आणि त्यातील विरोधाभास मनाला त्रस्त करून सोडतो आहे. उन्हात शाळा भरविणारे आणि शांतपणे मुलाना 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः' हा श्लोक शिकविणारे शिक्षक दिसताहेत आणि तरीही त्यांची इतर समाजाबद्दल काहीही तक्रार नाही हे पाहून मन धन्य होत आहे. 'आपल्याच जातीतले' पाटीलही डोळ्यांसमोरून हलत नाहीत. उपाशी पोटी अंथरुणावर पडलेली मुलं दिसताहेत आणि तरीही माणूस म्हणून मानानं जगण्याची जिद्द समोर दिसते आहे आणि मग मनाला उभारी येऊन पुढच्या प्रवासाचे बेत मनात येत आहेत.

आम्ही प्रयत्न करीत आहोत. कदाचित् ते सेतूच्या बांधकामातील खारीचे प्रयत्न असतील ! आपणही आपला वाटा उचलू शकता. □ □ □

[महाविद्यालयाच्या वार्षिकातून पुनर्मुद्रित]

८



साठीच्या
घरातली
उत्साही
तरुणी

# नतालिया गुसेवा

अनिल हवालदार

“ दिल्लीहून मोटारीने मी एका ठिकाणी जायला निघाले होते. मोटार भरवेगात धावत होती. एवढ्यात रस्त्यावर मी पाटी वाचली. – हस्तिनापूर ! ड्रायव्हरला मी एकदम ओरडून गाडी थांबवायला सांगितली. माझ्या ओरडण्यामुळे बिचकलेल्या ड्रायव्हरने ब्रेक्स दाबले आणि गाडी सरपटत रस्त्याच्या कडेला कशी-बशी थांबली. इच्छित स्थळी जाण्याचा बेत ताबडतोब पुढे ढकलला आणि हस्तिना-पुराच्या दिशेने मोर्चा वळविला...

हस्तिनापूर ! महाभारतामधल्या एकेक व्यक्तिरेखा नजरेसमोर येऊ लागल्या. धर्मराज उभा राहिलेला दिसू लागला...दुर्योधन, दुःशासन...अर्जुन...भीम... द्रौपदी आणि माझ्या मनाला मोहून टाकणारी महाभारतामधील ती व्यक्तिरेखा – कर्ण ! ही सारी माणसं काळाचा पडदा बाजूला सारून माझ्याशी हितगुज करू लागली ...आपली सुखदुःखं मला सांगू लागली आणि मी माझेपण विसरले.... रशियानामक देशातील नतालिया गुसेवा नावाची बाई विसाव्या शतकात अस्तित्वात आहे हेच विसरले आणि कौरव-पांडवांच्या जीवनामध्ये रमून गेले... खरंच, महाभारत आणि रामायण या अभिजात कलाकृतींना जगात तोड नाही...अशा या देशात तुम्ही राहता हे किती भाग्याचं ! आणि अशा या देशात मला दोन-तीन वेळा यायला मिळालं तेव्हा मीही भाग्यवानच म्हटलं पाहिजे...

रशियन भाषेत रामायणाला नाट्यरूप देऊन तमाम रशियन अबालवृद्धांना राम-सीतेची कहाणी पहिल्यांदा सांगण्याचा मान मिळविणाऱ्या मादाम नतालिया गुसेवा माझ्याशी बोलत होत्या. सोविएत लेखक, चित्रकार, कवी, शिल्पकार यांच्यासाठी भारत सरकारने १९६७ पासून नेहरू पारितोषिके सुरू केली आहेत. १९६८ च्या विजेत्यामध्ये श्रीमती नतालिया गुसेवा याना त्यांच्या रशियन नाट्यरूप रामायणाबद्दल पारितोषिक मिळाले आणि त्याचा स्वीकार करायला नुकत्याच त्या इतर विजेत्यांसमवेत भारतात येऊन गेल्या. या त्यांच्या भारत भेटीत मुंबई मुक्कामी ताजमहाल हॉटेलात त्यांची-माझी भेट घडली आणि दिवसभराच्या प्रचंड धावपळीनतरही ही साठीच्या घरात येत असलेली उत्साही 'तरुणी' तब्बल साडेचार तास बोलत राहिली.

मादाम नतालिया गुसेवा या मानववंशशास्त्राच्या संशोधक असून मॉस्कोतील मानववंशशास्त्राच्या विज्ञान-प्रबोधिनीमध्ये गेली २५ वर्षे त्या काम करीत आहेत. संस्कृत साहित्याचा त्यांनी थोडाफार अभ्यास केला असून 'शिशुपालवधम्' या विषयावर १९४१ मध्ये डिप्लोमा मिळविलेला आहे. युद्धकाळात हॉस्पिटलामध्ये शुश्रूषा करण्याचे काम करून युद्ध संपल्यावर १९४५ मध्ये नतालियाबाईंनी पुन्हा आपल्या संशोधनकार्याला सुरुवात केली. आत्तापर्यंत भारतीय कलेबाबत विविध सोविएत ज्ञानकोशासाठी त्यांनी ६० पेक्षा अधिक लेख लिहिले असून संशोधनपर विषयांवरील ४० पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्याशिवाय प्रा. कोसंबी यांच्या साहाय्याने भारतीय संस्कृतीवर, श्री. मोहन खोकड यांच्या साहाय्याने भारतीय नृत्यावर आणि श्री. व्ही. बी. राव यांच्या साहाय्याने भारतामधील धार्मिक चाली-रीतीवर मादाम गुसेवा यानी पुस्तके लिहिली आहेत.

तुलसी रामायणाचा आणि वाल्मिकी रामायणाचा आधार घेऊन नतालिया गुसेवा यानी रशियन रामायणाला नाट्यरूप दिले आहे. नृत्यनाट्याचा मूलाधार घेऊन ते रंगभूमीवर सादर करण्यात आले आणि रशियन बालकांनी ते अक्षरशः डोक्यावर घेतले. मात्र हाताच्या मुद्रांपुरताच भारतीय नृत्याचा आधार घेतल्याचे गुसेवा यानी प्रांजलपणे सांगितले. मुलांसाठी 'सुलभ महाभारत' त्यानी लिहिले असून त्यांच्या या पुस्तकाने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला आहे.

गुसेवा बाईंचे महाभारतामधील कथा-कथनाचे कार्यक्रम सोविएत संघराज्यातील नाट्यगृहामधून 'हाऊस-फुल्ल' गर्दीने चालतात. त्या म्हणाल्या — 'काय गंमत आहे पहा! सबंध आयुष्यभर मी लेखनकलेवर मेहनत घेतली आणि आता या वयात मी 'अभिनेत्री' बनायला लागले आहे पहा!'

'ही कथा-कथनाची कल्पना सुचली कशी ? मी

'मी माझ्या पतिराजाना — सुप्रसिद्ध सोविएत चित्रकार पताबेन्को यांना — महाभारतामधल्या कथा सांगायची. कथा सांगताना साहजिकच पात्रानुसार आपल्या

चेहऱ्यावर हावभाव बदलतात, आवाजात चढउतार येतात. ते म्हणाले की तू लोकांसमोर अशा पद्धतीनं गोष्टी का सांगत नाहीस? मला ते धाडस करावसं वाटलं. आणि काय आश्चर्य? हजार हजारांचा श्रोतृसमुदाय तीन तीन तास महाभारतामधल्या कथांमध्ये गुंगून जातो. पहिल्या पहिल्यांदा मला धीर यावा म्हणून माझे पतिराज रंगमंचावरच्या विंगेत बसून असायचे!'

प्राचीन भारतीय संस्कृतीची रशियन जनतेस ओळख करून देण्याचे हे कार्य गुसेवाबाई स्वयंस्फूर्तीने करीत आहेत. दूरचित्रवाणीवर दर महिन्यात त्यांचा 'भारत' या विषयावर किमान एकतरी कार्यक्रम होतो. लेखन तर चालूच असते. शिवाय छोटे छोटे अनुबोधपट व स्लाईडस् त्यांनी तयार केल्या असून 'सचित्र व्याख्यानां'चे कार्यक्रमही सतत चाललेले असतात.

जगाचा आणि जीवनाचा अनुभव घेऊन परिपक्व झालेल्या या पंडितेचे व्यक्तिमत्त्व मोठे विलोभनीय आहे. सहवास कमालीचा चैतन्यदायी आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी रशियन भाषा शिकविण्याच्या निमित्ताने नतालिया गुसेवा यांचा पुण्यनगरीत दोन महिने मुक्कम होता. त्यावेळी त्यांची राहण्याची व्यवस्था पुण्याचे मिठाईवाले घोडके यांच्या घरी केली होती. यावेळी मुंबईच्या 'इस्कस'ने आयोजित केलेल्या या नेहरू-पारितोषिक विजेत्यांच्या सत्कारात सबंध घोडके कुटुंबीय गुसेवा यांना भेटण्यासाठी आलेले पाहिले आणि या बाईच्या जिव्हाळ्याचे मोठे रमणीय दर्शन घडले. त्या सर्वांची नावनिशीवार चौकशी तिने केली. पुण्याला यावेळी जाता येत नाही म्हणून ती हळहळत होती. आणि समारंभानंतर श्री. घोडके यांची प्रकृती अचानक बिघडली तेव्हा सगळे कार्यक्रम बाजूला ठेवून ही बाई त्यांना आराम पडेपर्यंत तिथेच बसून राहिली. त्या कुटुंबाचा निरोप घेताना तर तिच्या पोटात

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. बम्बई-४.

अक्षरश: तुटत होते. " Anil, Passing is so sad ! "–एवढा एकच उद्गार तिच्या तोंडून निघाला. गाडी रस्त्याच्या कोपऱ्यावर वळेपर्यंत ती भरल्या डोळ्यांनी घोडके कुटुंबियांना हात करीत होती.

जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन, पोलिश, चेक या भाषा रशियन भाषेव्यतिरिक्त नतालिया गुसेवा यांना येतात. संस्कृतचा थोडा अभ्यास आहे आणि हिंदी कामा-पुरते समजते. त्यांची निरीक्षण शक्ती जबर आहे. पुण्याच्या दोन महिन्याच्या मुक्कामात आपल्या चालीरीतीची बाईने चांगली माहिती करून घेतली आहे.

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळखही नतालिया गुसेवा याना थोडीफार आहे. पुण्यात तमाशा थिएटरात जाऊन चक्क तमाशा पाहिलाय आणि लावणी प्रकाराची माझ्या-जवळ भरपूर स्तुती केली. मराठी सिनेमा मात्र प्राथमिक अवस्थेत असल्याचे जाणवले असे स्पष्टपणे सांगितले. मराठी नाटकाचा नतालिया बाईला जबर ध्यास दिसला. या भेटीत कार्यक्रमांची एवढी गर्दी होती की, धावपळ करून मी नाटकाची तिकीटे पैदा करूनही नाटकाला जाता आले नाही तेव्हा बाईच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या होत्या. त्या धावपळीत श्री. सुधीर फडके यांच्या 'गीतरामायणा'ला मात्र दहाच मिनिटे मी तिला नेऊ शकलो तेव्हा तिला झालेला आनंद शब्दात व्यक्त होत नव्हता. 'गीतरामायण' लिहिणाऱ्या महाराष्ट्र-वाल्मिकींना भेटायचीही तिला जबरदस्त इच्छा होती.

महाभारतामधील कर्णाची आणि रामायणातील लक्ष्मणाची व्यक्तिरेखा नतालिया गुसेवा यांना सर्वांत जास्त प्रिय आहे. कर्णावर त्या आता एक स्वतंत्र पुस्तक लिहिता-हेत, शिवाय कृष्ण-चरित्रावर एक बॅले बसविण्याचीही त्यांची इच्छा आहे. 'कर्ण,' 'लक्ष्मण' हे शब्द स्वच्छ उच्चारणाऱ्या नतालिया गुसेवा यांचे भारतीय संस्कृती-वरील प्रेम क्षणाक्षणाला व्यक्त होताना जाणवते. या बाईचा भारतवर्षाशी काही अज्ञात ऋणानुबंध असावा असे तिच्याशी बोलताना जाणवते. भारताच्या समृद्ध प्राचीन संस्कृतीची खुद्द भारतात हेळसांड होते....भारतीय लोक आपली प्राचीन कला, परंपरा जपत नाहीत याचा तिला खेद होताना जाणवत होता.

बाहुलीसारख्या चेहऱ्याच्या आणि बोलक्या डोळ्यांच्या नतालिया गुसेवा यांचे व्यक्तिमत्त्व खूप आवडून गेले. या व्यक्तिमत्त्वात चैतन्य आहे, जीवनाचा निश्चित-पणे प्रत्येक क्षण कारणी लावण्याची धडपड आहे, जीवनमूल्यांवर नितांत श्रद्धा आहे. आयुष्याच्या एवढ्या वाटचालीत या बाईने कितीक खस्ता खाल्ल्या असतील–पण त्यांचा उच्चार झाला नाही. बोलण्यात प्रतीत होत होती जीवनाची आसक्ती–जीवनाबद्दलचे नितांत प्रेम. भोवतालच्या तरुण समवयस्कांमध्ये जीवनाबद्दलचा सतत उदास-कंटाळवाणा भाव व्यक्त होत असलेला पाहणाऱ्या मला ही मागची पिढी फार फार आवडून गेली.

◻ ◻ ◻

# पाण्यांची फुले

सैय्यद अकबर

रेताळलेल्या पायवाटेने अमीनेच्या पावलांचे ठसे उमटत होते. तिच्या पावलांचे काही ठसे पुसत काही मागे सोडत आपल्या पावलाचे ठसे उमटवीत तिच्याच मागोमाग उस्मान चालत होता. कुठे मार्ग संपतो अमीनेला ठाऊक नव्हते. मध्येच ती विचारी – "बाबा, कुठे जायचे ?"

उस्मान कठोर आवाजत गरजायचा.

"चल चल."

बहुतेक पांढरे झालेले केस,,शरीरभर ढीले कपडे घातलेला उस्मान पन्नाशी ओलांडून गेला होता....

उस्मानचे लग्न झाल्यावर दुसऱ्याच वर्षी त्याला पुत्रप्राप्ती झाली होती. पुत्र-प्राप्ती म्हणजे अरबांच्या आनंदाला उधाण ! मुलगी झाली की जन्मत.च तिला दफणायचे. उस्मानने 'मुलगी होऊ नये म्हणून दिवसरात्र देवाची प्रार्थना केली होती. देवानेही त्याची कीव केली. पहिल्याच खेपेत त्याला मुलगा झाला. उस्मान गावातला म्होरक्या. बुद्धीने, चातुर्याने, विचाराने सर्वात पुढे. शिवाय समाजाची बंधने काटेकोरपणे पाळायची हे त्याचे ब्रीद. त्यामुळे साऱ्या गावात त्याला मान असे.

उस्मानला मुलगा झाल्याचे कळले आणि साऱ्या गावात जल्लोष जल्लोष झाला. उस्मानने गावभोजन दिले. साऱ्या गावकऱ्यांनी मुलाबद्दल शुभेच्छा व्यक्तवल्या.

आणि ह्या शुभेच्छा वाया गेल्या तरच नवलं ! उस्मानच्या मुलाची आकृती म्हणजे उस्माननेच बालपण घेतलेले. लहानपणापासूनच त्याने आपल्या बुद्धीची चुणूक दाखवायला सुरुवात केली. तरुणपणात तरवारीवर बसलेला त्याचा हात म्हणजे शत्रूला यमसदनास पाठविण्याचा निर्धार ठरला होता...

उस्मान अंतर्बाह्य सुखावत होता.

पहिल्या मुलापाठोपाठ दर दुसऱ्या वर्षीही त्याला पुत्रप्राप्ती होत गेली. परंतु सर्व मुले जन्मतःच मरण पावत. एका पाठोपाठ मुले मरत होती. उस्मान कडव्या मनानं दुःख झेलत होता. आपल्या मोठ्या मुलाकडे पाहून समाधान मानत होता. साऱ्या मुलांची उणीव त्याच्या मोठ्या मुलाने भरून काढली होती.

त्याच्या पत्नीला जैतूनला मात्र हे दुःख साहवत नव्हते. स्त्रीमनच ते! दर वेळेचा हा आघात पेलताना तिला अनंत यातना होत...मोठ्या मुलाने दिलेले समाधान मातृत्वापुढे थिटे पडत होते. नऊ महिने पोटात वाढवलेला गोळा स्तनाला ओठही न लावता निघून जात होता. ती हळवी झाली होती.

अचानक शत्रूंची धाड आली. अशा धाडी वारंवार येत. नेहमीच मुलाला पुढे करून उस्मान धावत होता. शत्रूचा हल्ला म्हणजे त्यांना खेळ झाला होता. ह्याही वेळेस उस्मानने आपल्या मुलाला त्याचे सखे सोबती घेऊन पुढे केले....आणि आपण साठीच्या जवळपास असताना स्वतः तोही पराक्रम गाजवायला मागोमाग निघाला. शत्रू पुढ्यात आल्याबरोबर उस्मानचा मुलगा व साथीदार त्याच्यावर तुटून पडले. शत्रूचे अनेक वीर त्यांनी लोळविले. उस्मानच्या मुलाच्या तरवारीचे पाते लखाखत होते. खाली गेलेला हात रक्त घेऊन वर उठत होता. शत्रूंचा धीर खचला. ते माघारे वळण्याची तयारी करू लागले.

...इतक्यात अचानक उस्मानच्या मुलाच्या हातातल्या तलवारीचे पाते निखळले. लोखंडी मूठ तेवढी हाती राहिली. त्याने आपल्या हाताकडे क्षणभर पाहिले.... तेवढ्यातच एक हात फिरला आणि उस्मानच्या मुलाचे धड घोड्यावरून खाली आले...शत्रूची दाणादाण उडवणारा आघाडीचा वीर पडला होता. साथीदारांचा उत्साह मावळला. सारे हतबुद्ध झाले. शत्रूला जोर चढला....कचाकच मुंड्या पडू लागल्या....

उस्मानने पाहिले. शत्रू माजल्यागत भिडला होता. एकवार उस्मानने मुलाच्या पडल्या धडाकडे पाहिले....आणि शस्त्र परजित तो पुढे झाला. शत्रूचे पुढचे पाऊल स्वतःचे मरण ठरू लागले. मित्रांचा गेला उत्साह फिरून उसळला. नवा जोम आला. आज शत्रूला कठोर शासन करण्याचा निर्धार करून ते फिरून भिडले.

शत्रूंना कळेना. पिकणाऱ्या केसाचा म्हातारा त्याच्याकडचे आघाडीचे वीर लोळवत होता. ते थरारले. मिळणाऱ्या वाटेने ते एका एकाने पसार होऊ लागले.

...आणि शेवटच्याला पळवून जेव्हा उस्मान परत पुत्राच्या शवाजवळ आला... तेव्हा त्याच्या तोंडावरचे हास्य मावळले होते. गोळा झालेले लोक अश्रू वाहवत होते. उस्मान पाहत होता. आयुष्यात त्याने अनंत आघात पाहिले होते. मन कठोर झाले होते. आईबाप मेले तेव्हा...स्वतःची लेकरे मेली तेव्हा...केव्हा केव्हाच त्याच्या डोळ्यात टिपूस आले नव्हते. पाहून वळण्यापेक्षा त्याने कधीच काही केले



नव्हते. मग पुत्रासाठी तो थोडाच रडणार होता.

"अरे, भागुबाईसारखे अश्रू काय गाळता ? उचला ते शव."

गावकऱ्यांनी शव उचलले...इतमानाने त्याला पुरण्यात आले.

शेवटची क्रिया करून उस्मान परतला. दारात येताच त्याने लहान अर्भकाचे रडणे ऐकले.

जैतून प्रसूत झाली होती.

"काय आहे ?"

"मुलगी."

"आणा तिला."

जैतून सोडायला तयार होईना. ऐन तारुण्यात तिचा मुलगा मारला गेला होता. घरातल्या त्याच्या पाऊल– खुणाही अद्याप पुसल्या गेल्या नव्हत्या. अशातच तिने नुकत्याच जन्म दिलेल्या मुलीला पुरण्यासाठी उस्मानच्या हाती सोपविणे

तिला साहवेना. पडलेल्या ह्या सामाजिक प्रथेची तिला मनापासून घृणा आली. ती उस्मानला म्हणाली—

"तुम्ही माझे दुःख समजू शकाल. नुकताच मुलगा गेला. अशा दुःखात मुलगीही नेऊन पुरायची? तिला राहू द्या. मला जरा तरी विरंगुळा होईल."

पण सामाजिक प्रथा मोडायला उस्मान तयार होईना. काहीच ऐकेना. शेवटी ..."दुसरा मुलगा जन्माला आल्यावर तुम्ही तिला अवश्य पुरा." ह्या शब्दावर विसंबून उस्मान परतला.

मुलगी वाढत होती. उस्मान चरफडत होता. दररोज बायकोवर चिडत होता. गावातल्या प्रतिष्ठितांबरोबर बसण्या उठण्याचा संकोच वाटत होता. पण जैतून तयारच होत नव्हती. "दुसरे मूल झाल्यावरच तिचे काय करायचे ते करा." असे ती म्हणे.

ह्या खेपेला पाळण्यातले अंतरही कमालीचे वाढले. एक एक दिवस उस्मानला डोईजड वाटू लागला. पण जेव्हा त्याने खुषखबर ऐकली तेव्हा मात्र तो कमालीचा आनंदला...पण आनंदाचा भर ओसरताच त्याला नऊ महिने कमालीचे भारी वाटायला लागले. कधी एकदाचे हे सारे संपते आणि कधी एकदा ही मुलगी डोळ्यासमोरून जाते असे त्याला वाटायचे.

जैतूनला मात्र वेगळ्याच कारणाने हे दिवस पळापळाने जवळ येताहेत असे वाटायचे. एव्हाना पाच वर्षांच्या झालेल्या अमीनेला जिवंत पुरण्यासाठी वडिलांच्या हाती सोपविणे तिला कसेसेच वाटे. नऊ महिने नऊ दिवसासारखे धावत येताहेत असे तिला भासे.

दोन जिवातले केवढे हे अंतर. आपआपल्या मनपसंतीतच माणूस सोय गैरसोय पाहत असतो हाच खरा मनुष्य स्वभाव!

एकीकडे अत्यंत दिरंगाईने आणि दुसरीकडे अत्यंत झपाट्याने नऊ मास संपले. एकीकडे सुखाचा डोंगर होता...दुसरीकडे दुःखाचा गिचगिचाट! उस्मान दुःखे झाडून हर्षित होत होता. त्याची बायको दुःखे पचवताना सुख मिळते का म्हणून चाचपडत होती. प्रसववेदनेने माता सुखावतेच अधिक. जैतूनला मात्र अधिकाधिक कठीणतर जात होते....

घटकापळे पळाली आणि चिमणे अर्भक चिवचिवले. उस्मानला त्याच्या आवाजात कल्पनातीत आनंद लाभला आणि जैतूनला त्याच्या रडण्यात कारुण्य...भय... निराशा जाणवली.

"काय आहे?"

"मुलगा."

"अमीना ऽऽऽ" उस्मान गरजला.


थुइथुइणाऱ्या
माधुर्याचा
पाहिलात
हा झरा?
फॅन्टा ऑरेंज...
इतके मधुर की,
तहानेतहि गंमत.
फॅन्टा—कोका-कोला कंपनीचे उत्पादन.
CMCF-2-152 MAR

जैतूनच्या डोळयातली आसवं थांबेनात. समाजाचा क्रूर खेळ तिच्याने पाहणे होईना.

" नका नेऊ हो तिला. "

" शब्द बोलू नकोस. "

उस्मानने त्याच्या बायकोचे काही न ऐकता अमीनेला पुढयात घातले. कुदळी पावडे घेतले.

" नीघ. "

...आणि रस्ताभर अमीना एकच विचारत होती–

" कुठे जायचे बाबा ? "

उस्मान कठोर शब्दात गरजायचा–

" चल पुढे. "

उस्मान अमीनेला स्मशानात घेऊन आला तेव्हा सांज व्हायला आली होती.

" भूक लागली ना बाबा. "

" गप्प बैस "

" पाणी तरी पाजा ना. "

पण उस्मान तिकडे लक्ष देत नव्हता. त्याने अमीनेचे वितीने माप घेतले... जमीनीवर तेवढया विती माडल्या...आणि खड्डा खणायला सुरुवात केली. अमीना नुसती पाहत होती.

उस्मान खणत होता...चांगला छातीभर खड्डा झाल्यावर त्याला समाधान वाटले. तरी त्याने पुन्हा एकदा अमीनेकडे व त्याच नजरेने खड्ड्याकडे पाहून घेतले. त्याला हायसे वाटले.

खड्डा खणण्यासाठी त्याला खूप श्रम पडले होते. ह्यापूर्वीच अमीनेला पुरायचे असते तर गुढगाभर खड्ड्याने भागले असते. मुलाना पुरायला सोबत जाणे गावकरी तुच्छ मानीत. त्याची मुलगा त्याने एकटयानेच पुरायची. अमीना मोठी झाली होती. गावात चर्चेचा विषय ठरली होती. उस्मानने तिला जन्मतःच पुरले नाही म्हणून त्यांचा सुप्त रोष होताच. त्यामुळे उस्मानसोबत कुणी येणे शक्यच नव्हते. उस्मानने एकटयानेच खड्डा खणला. अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या...

सांजेचे तोंड काळवंडले होते...अकारणी वाहवल्या जाणाऱ्या घामाच्या धारा तिच्याच्याने पाहणे होईना.

उस्मान गरजला–" उतर खड्ड्यात. "

" अंधारात ? मला भिती वाटते बाबा. "

उस्मानने खस्कन तिला ओढले. अमीनाला जबरेने झोपवून त्याने खड्डा भरायला सुरुवात केली.

" असे काय करता...मरेन बाबा मी."

" चूप."

अमीना खूप घाबरली होती. उठायचे, धडपडायचे तिचे प्रयत्न निष्फळ ठरले होते. शेवटी आपले काहीच ऐकले जात नाही हे पाहून ती शात झाली. कोवळया वयाचा...मृत्युसमोर जाण्याचा निर्धार तिच्या शात चेहऱ्यावर झळकला.

उस्मान माती ओढत होता. खाली बसूत माती बरोबर दाबत होता.

अमीनाचा हात हलला...दबल्या मातीतून वर आला. बसलेल्या पित्याच्या दाढीजवळ तो हात नेत आणि दाढीला लागलेली माती झटकीत ती म्हणाली–

" बाबा, तुमच्या दाढीत माती घुसलीय. झटकाना ती."

उस्मान चरकला. पाच वर्षाच्या बालिकेला मृत्यूच्या दारातही आपल्या पित्याच्या श्रमाची जाणीव झाली होती. उस्मानला आपला धीर खचतो असे वाटले. त्याने आपली सारी शक्ती एकवटून खचाखच माती ओढली...मुलीच्या हालचालीकडे लक्षही दिले नाही. खड्डा पूर्ण भरला.

निघणार...तोच–

त्याच्या कानात कुणीतरी कुजबुजल्याचा भास झाला. कुणीतरी म्हणत होतं–

" बाबा, तुमच्या दाढीत माती घुसलीय. झटकाना ती."

उस्मानने फुगलेल्या त्या खड्ड्याकडे पाहिले, तशी टच्कन त्याच्या डोळ्यात आसवे उभी राहिली. क्षणात आसवाचा पूर वाहू लागला...सारे जग आवसांच्या थेंबात साठवलय असे त्याला वाटले. परतून कबर उपसावी आणि लाडक्या अमीनेला खूप कुरवाळावे...अशी त्याला अनावर इच्छा झाली.

पण समाजाचे नराधम रूप अश्रूतूनही त्याच्या पुढे उभे राहिले.

उस्मानने झपाट्याने पावलं उचलली. गावाच्या सीमेजवळ थांबून अश्रू पुसून टाकण्याचे त्याने खूप प्रयत्न केले, परंतु ते शक्य झाले नाही.

तो पुढे झाला.

लोक पाहत होते. आयुष्यात कधी न रडलेला उस्मान आसवे वाहवत होता.

परंतु उस्मान...

पापणीच्या फुलांनी त्याच्या डोळ्यांना लेकुरवाळे केले होते...वाझोट पापणीच्या या लेकुरवाळेपणातूनच एखादा प्रेषित जन्माला येणार असल्याचे त्याला आसवाच्या थेंबाथेंबातून जाणवत होते...

पाहणाऱ्या लोकांकडे पाहण्याची त्याला आता गरजच उरली नव्हती.

पुस्तके

# दोन चरित्रे

प्रा. म. ना. लोही

| | |
|---|---|
| गडकरी | कोल्हटकर |
| जीवन | आणि |
| चरित्र | हिराबाई |

महाराष्ट्राचे थोर नाटककार आणि विनोदाचार्य कै. श्रीपाद कृष्ण तथा तात्या-साहेब कोल्हटकर यांच्या दोन शिष्यांचे चरित्रग्रंथ एकाच वेळी प्रसिद्ध व्हावेत हा योगायोगच म्हणावा लागेल. हे दोन ग्रंथ म्हणजे 'गडकरी जीवन चरित्र' आणि 'कोल्हटकर आणि हिराबाई.'

कोल्हटकरांचा शिष्यसंप्रदाय बराच मोठा होता. वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर आणि भा. वि. वरेरकर हे कोल्हटकरांना लेखनगुरू मानतात. राम गणेश गडकरी हे कोल्हटकरांना केवळ लेखनगुरूच नव्हे तर सर्वार्थाने गुरु मानीत. त्यांच्या लेखनावर कोल्हटकरांची जेवढी छाप दिसते तेवढी त्यांच्या अन्य शिष्यो-त्तमांच्या लेखनावर दिसत नाही. "तात्या ती तलवार एक तुमची, बाकी विळे कोयते" असे म्हणून गोविंदाग्रजांनी आपल्या गुरूची महती गायिली आहे. कोणी 'कोल्हटकर आणि गडकरी' या नावाचा ग्रंथ लिहिला तर नवल वाटायला नको. मात्र या वेळी 'कोल्हटकर आणि हिराबाई' असे शीर्षक देऊन प्रा. म. ल. वऱ्हाड-पांडे यांनी हिराबाई पेडणेकरांवरील चरित्रग्रंथ प्रसिद्ध केला आहे. 'गडकरी जीवन चरित्र'चे लेखक आहेत श्री. वि. ना. कोठीवाले.

गडकरी आणि हिराबाई कवी व नाटककार होते एवढेच नव्हे तर गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास'च्या काही दिवस आधीच हिराबाईंचे 'दामिनी' हे नाटक रंगभूमी-वर आले; पण गडकरी मृत्यूच्या अखेरच्या घटकेपर्यंत नाटके लिहीत होते तर केवळ दोन नाटके लिहून हिराबाईंनी जो नाट्यसंन्यास घेतला तो कायमचाच. हा त्यांच्या लेखनप्रकृतीमधील फरक नजरेआड करता येणार नाही. तथापि, मराठी रंगभूमीवर

चमकलेली पहिली स्त्री–नाटककार म्हणून हिराबाईंनाही मराठी रंगभूमीच्या इतिहासात मानाचे पान मिळेल.

## योगायोग

गडकरी आणि हिराबाई याचा जन्म एकाच वर्षाचा. (इ.स. १८८५) दोघांचेही कोल्हटकरांशी स्नेहसबंध जुळले ते फार थोड्या अंतराने. पुढे त्याचा परस्पर परिचयही झाला. गडकऱ्यांनी हिराबाईंकडून पदाच्या चालीही घेतल्या. असे असूनही हिरावाईंची महाराष्ट्राला केव्हाच विस्मृती पडली तर गडकऱ्याची स्मृती कायम आहे. तरीही गडकऱ्यांचे चरित्र गेली पन्नास वर्षे प्रसिद्ध झाले नाही आणि झाले ते योगायोगाने हिराबाईंच्या चरित्राबरोबरच. म्हणूनच त्यांचा परिचयही एकदम करून देणे अप्रस्तुत ठरू नये.


राम गणेश गडकरी हे कवी आणि विनोदी लेखक असले तरी महाराष्ट्रात नाटककार म्हणून त्यांना बहुमान प्राप्त झालेला आहे. त्यांची पुण्यतिथी सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. त्याच्या नाटकाची व काव्याची जेवढी समीक्षा झालेली आहे तेवढी इतर कोणत्याही साहित्यिकाच्या वाट्याला आलेली नाही. तरीही गेली पन्नास वर्षे त्याचे चरित्र काही कोणी लिहून प्रसिद्ध केले नाही. किर्लोस्कर नाटक मंडळीचे शंकरराव मुजुमदार यानी गडकऱ्याच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनी त्याचे छोटेखानी चरित्र लिहिले. त्यानंतर 'गडकरी: व्यक्ति आणि वाङ्मय' या ग्रंथात वि. स. खांडेकरानी गडकऱ्यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. 'माझे नाटककार' म्हणून गडकऱ्यांवर चिंतामणराव कोल्हटकरांनी एक प्रदीर्घ प्रकरण 'बहुरूपी' या आत्मचरित्रात लिहिले. मात्र स्वतंत्र चरित्र प्रसिद्ध झाले नव्हते. ती उणीव श्री. वि. ना. कोठीवाले यानी 'गडकरी जीवन चरित्रा'ने भरून काढली.

या पुस्तकात गडकऱ्याच्या समकालीन नाट्यक्षेत्रातील अनेक व्यक्तींची लेखकाने मनोज्ञ शब्दचित्रे रेखाटली आहेत. आपल्या या ग्रंथाच्या सिद्धीसाठी लेखकाने चार तपे अथक परिश्रम केले. गडकऱ्यांच्या आप्तस्वकीयांच्या आणि स्नेह्यासोबत्यांच्या भेटी व मुलाखती घेऊन, आठवणी आणि आख्यायिकांचे परिशीलन करून आणि पत्रव्यवहार नजरेखाली घालून त्यांनी हे चरित्र सजवले आहे. गडकऱ्यांविषयी लेखकाच्या मनात अतीव जिव्हाळा वसत आहे. तो त्यांनी ग्रंथारंभी व्यक्तही केला आहे. एवढेच नव्हे तर गडकऱ्याच्या नाटकांचा लेखकाचा प्रगाढ व्यासंग असून त्याचे अपूर्ण 'गर्व निर्वाण' पूर्ण करण्याचा खटाटोपही त्यांनी केलेला आहे. अशा अधिकारी व्यक्तीने लिहिलेले 'गडकरी जीवन चरित्र' मौलिक ठरावे यात नवल ते काय?

गडकऱ्यांच्या या चरित्राची काही वैशिष्ट्ये सांगता येतील तशीच काही वैगुण्येही दाखविता येतील. पण वैगुण्यरहित कलाकृती दाखवणे कठीण. गडकऱ्यांच्या

चरित्रातील महत्त्वाच्या घटनांवर लेखकाने साधार प्रकाश टाकलेला आहे. त्यांच्यासंबंधी ज्या लेखकांनी लिहिले त्यांच्या लेखनातील दोष परखडपणे दाखवून दिले आहेत. प्रसंगी त्यांची भाषा कठोर होते. हा त्यांचा स्वभावगुण म्हणा अगर स्वभावदोष समजा. क्वचित प्रसंगी अन्यत्र प्रकाशित झालेल्या माहितीचा त्यांनी विस्तृत वापर केलेला आहे. पार्श्वभूमी म्हणून उपयोग करणे वेगळे आणि तपशील-वार पुनरुक्ती करणे वेगळे. हा एक दोषच म्हणावा लागेल.

मात्र चरित्रनायकाचे चित्रण लेखकाने काटेकोरपणे केले आहे. त्यांच्या स्वभावातील विक्षिप्तपणा आणि अहंमन्यता दाखवायला लेखक कचरले नाहीत. गडकऱ्यांचे त्यांच्या गुणदोषांसह त्यांनी वर्णिलेले व्यक्तिमत्त्व आणि चरित्र वाचकाला आवडल्याशिवाय राहणार नाही. चरित्रलेखकाचा आणखी एक विशेष असा की, चरित्रनायकाची मल्लीनाथी त्याने केलेली नाही. त्यांची प्रतिमा वास्तवपूर्ण (Natural) रेखाटण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. तरीही गडकऱ्यांच्या जीवनातील अज्ञात व रहस्यपूर्ण प्रेमप्रकरणावर उचित प्रकाश न टाकण्याचा लेखकाचा हेतू स्पष्ट होत नाही. गडकरी स्त्रीविमुख आणि स्त्रीद्वेष्टे असावेत हा आक्षेप लेखकाला मान्य नाही. आणि ते बरोबरही आहे. स्त्रीसहवास जर त्यांना नको असता तर ते हिराबाई पेडणेकरांकडे गेलेच नसते. त्यांच्याकडून पदांच्या चाली त्यांनी आणल्याच नसत्या. पण त्यांच्या कविमनावर आधिपत्य



गाजविणारी आणि त्यांच्या संसारसुखाचा विचका करणारी ही अज्ञात व्यक्ती कोण ? हे रहस्य कायमच आहे.

असे असूनही गडकऱ्याचे चरित्र लिहिण्याचा खटाटोप करून तो तडीस नेला याबद्दल गडकऱ्यांचे चाहते आणि गडकरी-वाङ्मयाचे अभ्यासक त्यांचे ऋण अमान्य करणार नाहीत. पुस्तकाला डॉ. रा. शं. वाळिंबे याची जी मार्मिक व मर्मग्राही प्रस्तावना जोडली आहे. तिच्यामुळे हे चरित्र मौलिक ठरेल यात शंका नाही.

## उपेक्षित नाटककर्ती

कालौघात ज्याची स्मृती नष्ट होऊ पाहात होती अशा एका नाटककर्तीचे चरित्र लिहून श्री. म. ल. वऱ्हाडपाडे याना एक मोलाची कामगिरी बजावली आहे. भारतात नेहमीच स्त्रीची उपेक्षा झालेली आहे. त्यातून हिराबाई एक नायकीण-कन्या. कालामानानुसार सुविद्य, सुस्वरूप आणि रसिकप्रिया. अशा स्त्रीचे चरित्र लिहिले जाण्याची ही पहिलीच वेळ. डॉ. आनंदी जोशी किंवा रमाबाई रानडे या वेगळ्या थरातल्या स्त्रिया होत्या. समाजाच्या आदराला पात्र झालेल्या होत्या. हा मान हिराबाईंना मिळणे कसे शक्य आहे ?

पण ऐन तारुण्यात त्यांच्या सुदैवाने हिराबाईंचा तत्कालीन मान्यवर साहित्यिकाशी परिचय झाला. बैठकी रगू लागल्या. अशातच त्याची तात्यासाहेबांशी ओळख झाली. पुढे या ओळखीचे स्नेहात परिवर्तन झाले. नटवर्य नानासाहेब जोगळेकरांसारख्या देखण्या तरुण पुरुषावर आसक्त झालेल्या हिराबाईवर जेव्हा त्यांच्या चिरवियोगाचा दुर्धर प्रसग ओढवला तेव्हा त्या दुःखात सांत्वन करणाऱ्या, सहानुभूती दाखवणाऱ्या प्रौढ तात्यासाहेबाकडे ही बाई आकर्षित झाली. कोल्हटकराच्या सहवासाचा व प्रोत्साहनाचा परिपाक म्हणजे हिराबाईंची दोन नाट्यापत्ये. एक, 'जयद्रथ विडंबन' आणि दुसरे, 'संगीत दामिनी.' कोल्हटकराच्या खटपटीने 'दामिनी' नाटक 'ललितकलादर्श'च्या रंगभूमीवर आले. असा हा थोडक्यात हिराबाई व कोल्हटकराच्या संबंधाचा इतिहास आहे. त्यावर लेखकाने परिश्रमपूर्वक प्रकाश टाकलेला आहे. त्याबद्दल लेखकाचे अभिनंदन केले पाहिजे.

लेखकाने या चरित्रग्रंथाला 'कोल्हटकर आणि हिराबाई' असे शीर्षक का द्यावे याचा उलगडा होत नाही. कोल्हटकर आणि हिराबाई याचे सबध विशुद्ध गुरुशिष्याचे असावेत असे म्हणणे कठीण आहे. कोल्हटकरांच्या मनाची चलविचल उडवून देणाऱ्या रूपवतीला या प्रकरणात महत्त्व आहे. हिराबाईंनी त्याना किती विचलीत केले होते याचे त्यानी स्वतःच आत्मचरित्रात निवेदन करून ठेवले आहे. विकलीत आणि विचलीत झालेल्या हिराबाईंनी काही काळ कोल्हटकराचा आसरा शोधला याचा अर्थ त्या अनुरक्त झाल्या असा कसा करता येईल ? किंबहुना एवढ्यावरूनच हिराबाईंच्या जीवनात कोल्हटकराना महत्त्व येत नाही.

कोल्हटकरांना आपली प्रतिष्ठा सांभाळून हिराबाईशी संबंध ठेवणे कठीण झाले

तेव्हा त्यानी माघार घेतली. हिराबाईनी तिसऱ्या व्यक्तीचा आश्रय घेतला. त्यानंतर या बाईंच्या साहित्यिक जीवनाचा अस्त झाला. त्यामुळेच इ. स. १९०८ साली 'दामिनो' नाटक व त्यातील पदे लिहून झाल्यावर पुढील बेचाळीस वर्षे हिराबाईंची साहित्यनिर्मिती कायमची बद झाली. हिराबाईंना नाटककर्ती बनवण्याचे श्रेय जर कोल्हटकराना दिले तर त्याना साहित्याच्या दरबारातून उठवण्याचे पापही त्याच्या माथी मारावे लागेल! साराश, कोल्हटकराना हिराबाईंच्या जीवन-नाटच त काही काळ जरी नायकाचे स्थान दिले तरी पुढील शोकातिकेतील त्याचे स्थान ठरविणे जड जाईल. म्हणून 'कोल्हटकर आणि हिराबाई' हे शीर्षक फारसे रुचण्यासारखे नाही.

या ग्रथाला श्री. ग. त्र्यं. माडखोलकराची एक्कावन्न पृष्ठांची प्रदीर्घ प्रस्तावना आहे.

लेखकाने आपली भूमिका व्यवस्थित पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे. आपल्या विधानास पुष्टी देण्यासाठी त्याने टीपा जोडल्या आहेत आणि पत्रव्यवहार दिला आहे. काही वाचकाना हे पुस्तक वाचताना 'मिया मुठभर नि दाढी हातभर' या म्हणीची आठवण येण्याचा सभव आहे. पण ज्या उपेक्षितेवर आपण लिहीत आहो तिच्यावर अन्याय होऊ नये या प्रामाणिक भूमिकेतूनच हा प्रमाद (वाचकाना तसे वाटल्यास) घडला आहे. तथापि, या चरित्राने मराठीच्या चरित्र-वाङ्मयात मोलाची भर पडली आहे हे नाकारता येणार नाही. ◻

गडकरी जीवन चरित्र – वि. ना. कोठीवाले,
उषा प्रकाशन, पुणे. मूल्य : साडेबारा रुपये.

कोल्हटकर आणि हिराबाई – म. ल. वऱ्हाडपांडे.
साहित्य सहकार संघ लि., मुंबई : मूल्य दहा रुपये

◻ ◻ ◻


# मुजऱ्याचे मानकरी

ब. मो. पुरंदरे

तीन रुपये

राजहंस प्रकाशन




## अनंत भावे

## चार

सफोक नॉरफोकने रात्रीच्या बिकट पहाऱ्याची तयारी केली आणि रात्रीच्या अंधाराचा फायदा कसा उठवता येईल, या विचारात 'बिस्मार्क' मग्न झाली.

अद्ययावत रडार-व्यवस्थेमुळे सफोकवर जबाबदारी अधिक होती. त्या रडारच्या साहाय्याने 'बिस्मार्क'वर रात्रभर पाळत ठेऊन सकाळी टोर्व्हीच्या काळदाढेत तिला सोडायची, अशी योजना होती. गेल्या चार रात्रीत सफोकच्या कॅप्टन एलिसला पळभरही झोप मिळाली नव्हती. तो दमला होता. त्याची गात्रे बधिर झाली होती. परंतु बाकीच्या अधिकाऱ्यांनी पाळी-पाळीने विश्रांती घेतली तरी एलिस कायम जागाच होता.

नॉरफोकवर वेकवॉकर आणि फिलिप्स यांची स्थिती थोडी बरी होती. त्यांना मधूनमधून थोडी झोप मिळाली होती. पण गेल्या अठ्ठेचाळीस तासात तेही जागेच होते. झोप येऊ नये म्हणून त्यांनी बेंझेड्राइन-गोळ्या घेतल्या होत्या. पण त्या गोळ्यांनी मुळी शरिरातील शक्ती शोषून घेतली होती. त्यामुळे त्यांना अधिकच थकवा आला होता.

नागमोडी चालीमुळे 'बिस्मार्क'चा पाठलाग करण्याचे काम अधिकच अवघड झाले होते. या जलविभागात जर्मन पाणबुड्या असण्याचा संभव होता; आणि नागमोडी चालीपलीकडे त्यांच्यावर दुसरा उपाय नव्हता. पण त्यामुळे 'बिस्मार्क' पुन्हा पुन्हा सफोकच्या रडारवरून अदृश्य होत होती.

'बिस्मार्क'च्या पिछाडीला सफोकने घेतलेली जागा थोडीशी गैरसोयीची होती. कारण त्यामुळे नागमोडी चालीत सफोक एका विशिष्ट बाजूला वळल्यावर 'बिस्मार्क' तिच्या रडारवर टिपलीच जात नव्हती. सफोक दुसऱ्या बाजूला वळल्यावर 'बिस्मार्क' रडारवर पुन्हा दिसू लागे. बाकीच्या नौका सफोकमागून चालत होत्या. म्हणजे 'बिस्मार्क'च्या पुढील उजव्या बाजूवर मुळी लक्षच ठेवले जात नव्हते. पाठलाग करताना अशा जागा ब्रिटिश नौकांनी का घेतल्या ते कधीच कळले नाही. कदाचित एलिसने रडारवर संपूर्ण विश्वास टाकला असावा. शिवाय रात्रही फारशी अंधारी नव्हती. आणि इतक्या तासाच्या कडक पहाऱ्यानतर ब्रिटिश नौका थकल्या होत्या. त्यांच्या वृत्ती थोड्या शिथिल झाल्या होत्या. त्यामुळे अपेक्षेपेक्षा जास्त काही काळ 'बिस्मार्क' रडारवरून अदृश्य झाली तरी एलिसला फारशी कदर वाटत नव्हती.

...पण मध्येच पुरा एक तास होऊन गेला तरी रडारवर 'बिस्मार्क'ची चाहुल लागली नाही. एलिस चमकला. त्याचा बधिरपणा एकदम नाहीसा झाला. 'बिस्मार्क'शी आपला संपर्क तुटल्याची इशारत त्याने नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाला दिली.

किंग जॉर्ज द फिफ्थवर दर्यासारंग टोव्हीचा नुकताच डोळा लागला होता. त्यांच्या अंदाजाप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास 'बिस्मार्क'शी गाठ पडणार होती. त्याची विश्रांती हा युद्धाच्या तयारीचाच भाग होता. पण चार वाजताच त्याना उठवण्यात येऊन, सफोकचा 'बिस्मार्क'शी संपर्क तुटल्याची दुर्वार्ता त्याच्या कानावर घालण्यात आली.

या बातमीनंतर टोव्हींना झोप लागणे शक्यच नव्हते. ते उठले आणि व्याकुळपणे पुढील बातमीची वाट पाहात बसले. सफोकचा 'बिस्मार्क'शी संपर्क तात्पुरताच तुटला असेल, असे मानून हुरहुरणाऱ्या मनाची समजूत घालण्याचा यत्न ते करू लागले.

पण आणखी एक तास गेला. मग वार्ता आली ती 'बिस्मार्क' अजूनही बेपत्ता असल्याची. व्हिक्टोरियसच्या विमानानी पहाटे तिचा शोध करावा अशी विनंतीही एलिसने केली होती. आपली पुढील उजवी बाजू दुर्लक्षित आहे असे लक्षात येताच 'बिस्मार्क'च्या कर्णधाराने, त्याचा तत्काळ फायदा उठवून, एक प्रचंड वळण घेऊन ब्रिटिश नौकांना झुकांडी दिली होती; आणि नागमोडीत रडारवरून अदृश्य झालेली 'बिस्मार्क' यथाकाल रडारवर पुन्हा दृश्यमान होण्याची वाट पाहात कॅप्टन एलिस बसला होता.

हजारो मैलांच्या महासागरात चोहोबाजूंनी वेढून 'बिस्मार्क'ची कोंडी करण्याचा प्रयत्न ब्रिटिश नौदलाने चालवला होता. आतापर्यंत, हानी होऊनही, एकूण योजना उद्दिष्टाप्रमाणे व्यवस्थित आकार घेत होती. आणि अचानक 'बिस्मार्क' गहाळ झाली होती. ब्रिटिश नौका हवालदिल झाल्या. त्यांचे कर्णधार आणि त्यांच्या हाताखालचे लहानमोठे अधिकारी नकाशे आणि आराखडे यात डोकी घालून बसले होते. 'बिस्मार्क' कोठे असेल, हे ठरवण्याचा यत्न करत होते.

अखेर 'बिस्मार्क'ने ब्रिटिश शिकाऱ्यांना चकवले होते. डोळ्यात तेल घालून गेले साडे एकतीस तास तिच्यावर पाळत ठेऊन असणाऱ्या चिवट ब्रिटिश नौकांना तिने झुकांडी दिली होती. एव्हाना कमाल वेगाने ती घरच्या सुरक्षित मार्गाला लागली असण्याचा संभव होता.

'बिस्मार्क'ला जाळ्यात पकडून नष्ट करणे ब्रिटिश नौदलाला आता कसे जमणार होते कोणास ठाऊक. आणि पंतप्रधान चर्चिल यांनी तर इकडे तसा निर्वाणीचा आदेश दिला होता!

या सागरी मोहिमेचे क्षेत्र अत्यंत विस्तृत होते. कित्येक नौका, विमाने, मोठे-लहान असंख्य अधिकारी तिच्यात गुंतले होते. हजारो मैलांच्या या महासागर-पृष्ठावर एकाकी नौकेचा शोध करण्याच्या या कामगिरीत कितीजणांचा कशा प्रकारे हातभार लागत होता, हे पाहणे मोठे मनोरंजक आणि उद्बोधक ठरेल. नौदलाच्या इतिहासात 'बिस्मार्क'च्या विलक्षण शोध-मोहिमेला तोड सापडत नाही. असा संघटित प्रयत्न, इतक्या मोठ्या प्रमाणावर क्वचितच झाला असेल!

या प्रयत्नांचे केंद्रस्थान म्हणजे नौदलाचे मध्यवर्ती कार्यालय. तेथे अनुभवी आणि मुरब्बी अधिकारी 'बिस्मार्क'च्या संभाव्य हालचाली आणि ठिकाणा याची चर्चा करत होते. अर्थात सगळ्यांच्या कल्पना नेहमीच जुळत होत्या असे नाही. मग ज्याची कल्पना सर्व बाजूंनी योग्य वाटेल, तिचा पाठपुरावा करण्यात येत होता. नकाशे पाहून आपल्या कोणत्या नौका शत्रूला रोखू शकतील याचा अभ्यास चालू होता.

तिकडे टेहळणी करणारी किनारादलाची विमाने सागरावर घिरट्या घालून हरवलेल्या 'बिस्मार्क'चा शोध करतच होती. सागराच्या असीम विस्ताराचे टेहळणीकरता विभाग केलेले होते. या विभागांच्या सीमा एकमेकात गुंतलेल्या होत्या; त्यामुळे 'बिस्मार्क' विभागसीमेवरून लक्ष चुकवून निसटून जाऊ शकत नव्हती. विमानांच्या टेहळणीच्या अहवालांची नौदलांच्या कार्यालयात कसून छाननी करण्यात येत होती,

आणि 'बिस्मार्क' सापडली का नाही, या प्रश्नाचा चर्चिलसाहेबांनी धोशाच चालवला होता.

निद्रिस्त ब्रिटिश जनतेला नौदलाच्या या बेभान प्रयत्नांची कल्पनाच नव्हती.

परतु या मोहिमेशी संबधित अधिकाऱ्यांना आणि नाविकांना मात्र निद्रासुख अनुभवणे शक्य नव्हते.

सकाळ झाली. अजूनही 'बिस्मार्क' सापडली नव्हती.

मग एक गोंधळात टाकणारी गोष्ट घडली. एक बिनतारी संदेश ब्रिटिश नौदल कार्यालयाने मध्येच टिपला होता. शत्रूच्या नौकेवरून तो आला असल्याची खात्री होती. हे विलक्षणच होते. हा संदेश 'बिस्मार्क'ची असेल काय? पण ब्रिटिश नौकाना योजनापूर्वक झुकांडी दिल्यावर आपला ठावठिकाणा आपणच जाहीर करण्याचा आत्माघातकी वेडेपणा 'बिस्मार्क' करेल, असे मानणे जरा कठीण होते.

त्यामुळे हा संदेश खरोखरी कोणाचा आहे, हा प्रश्न नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयापुढे पडला होता.

टोव्हींचा शोध, 'बिस्मार्क' कोठे आहे, या मूळपदावर आला होता. या प्रश्नाची अनेक उतरे संभवत होती. त्यातील अचूक उत्तर वेळीच सापडले तर यश, नाहीतर पराजय आणि नामुष्की, असा मामला गभीर झाला होता. इतर आघाडयांवरदेखील ब्रिटनचा जागोजाग पराजय होत होता. हूडचा विनाश आणि 'बिस्मार्क'ची हिकमती सुटका या सार्वत्रिक पराजयाच्या दु:खावर दिलेल्या डागण्याच ठरल्या असत्या.

नैऋत्येला अॅझोरेस वा कानारिसकडे उत्तरेला ग्रीनलॅंडकडे व जर्मनी वा स्पेन वा फ्रान्सकडे – 'बिस्मार्क' कोठही जाणे शक्य होते. आपल्या दृष्टीने सर्वात अनिष्ट ते घडण्याची अपेक्षा करून त्याला तोंड देण्याची सिद्धता करायची असा टोव्हीचा स्वभाव होता. 'बिस्मार्क'कडूनही त्यानी तीच अपेक्षा केली. त्यामुळे अटलांटिकमध्येच कोठेतरी तेल भरून घेऊन 'बिस्मार्क' पुन्हा अन्नवाहू नौकांवर घसरेल, अशी अपेक्षा त्यानी केली. हे सूत्र लक्षात घेऊनच त्यांनी प्रतिकारयोजना आखायला सुरुवात केली.

दरम्यान हरवलेल्या 'बिस्मार्क'ची संभाव्य दिशा ठरवताना कॅप्टन एलिसने चूक केली अशी खात्री वाटून वेकवॉकरने सफोकला नैऋत्य व पश्चिम बाजूला शोध करण्याचा हुकुम सोडला. स्वत:ची नॉरफोकही त्याने पश्चिमेला नेली. नंतर प्रिन्स ऑफ वेल्सला त्याने दर्यासारग टोव्हीच्या मदतीला पाठवून दिली. 'बिस्मार्क' हरवल्यामुळे त्याला प्रिन्स ऑफ वेल्ससारख्या युद्धनौकेची गरज नव्हती.

व्हिक्टोरियसवर कॅप्टन बॉवेलने 'बिस्मार्क' हरवल्याची वार्ता ऐकली. तेव्हा ती फ्रान्सच्या पश्चिम किनाऱ्यावरील ब्रेस्ट बंदराकडे जात असली पाहिजे अशी त्याची खात्री झाली. त्याप्रमाणे ब्रेस्ट व व्हिक्टोरियसमधील सागरपट्टीत 'बिस्मार्क'चा शोध करण्याची परवानगी त्याने रिअर अॅडमिरल कर्टिसकडे मागितली. इतक्यात टोव्हीनी बॉवेलला विमानानी वायव्य दिशा धुंडाळण्याचा हुकुम केला. बॉवेलने व्हिक्टोरियस वायव्येला वळवली.

लवकरच टोव्हीना आपल्या काफिल्यातील रिपल्स या युद्धनौकेला तेलभरीसाठी न्यूफौडलंड येथे पाठवावे लागणार होते. तिची जागा घेण्यासाठी एका युद्धनौकेची गरज त्याना होती. रॉडने ही एकच युद्धनौका ती गरज भागवू शकली असती. मागील योजनेप्रमाणे ती कमाल वेगाने 'बिस्मार्क'ला रोखण्यासाठी येत होती. तिच्या कप्तानाला—कॅप्टन दार्लरिपल—हॅमिल्टनला—'बिस्मार्क' हरवल्याची वार्ता वाटेतच समजली. ती निश्चित युरोपच्या पश्चिम किनाऱ्याकडे वळली असावी, असे दार्लरिपल—हॅमिल्टनला वाटले. त्यामुळे 'बिस्मार्क'ने वेकवॉकरला ज्या स्थळी झुकांडी दिली होती त्या स्थळाच्या आग्नेयेला रॉडनेचा मोहोरा त्याने वळवला.

रॉडनेवर असलेल्या लहानमोठ्या अधिकाऱ्यांची एक समितीच दार्लरिपल—हॅमिल्टनने तयार केली होती. 'बिस्मार्क' कोणत्याही दिशेला गेली असली तरी तिला गाठणे रॉडनेलाच सर्वात अधिक शक्य आहे, असे समितीचे मत झाले. 'बिस्मार्क' फ्रेंच वा स्पॅनिश—अधिक करून स्पॅनिश—बदराकडे गेली असावी, असा समितीचा अदाज होता. कारण स्पेन देश तटस्थ असला तरी त्याची सहानुभूती जर्मनीला होती. शिवाय फ्रेंच बदरात ब्रिटिश विमानातून बिस्मार्क'वर बॉंबहल्ला होणे शक्य होते; स्पॅनिश बंदरात ही भीती नव्हती.

'बिस्मार्क'ला गाठू पाहणाऱ्या इतर नौका कोठल्या कोठे होत्या. व्हाईस अॅडमिरल सॉमरव्हिल यांचा एच् विभाग शत्रूच्या शेवटच्या ज्ञात ठिकाणापासून सुमारे हजारो मैलावर होता. एडिंबरो क्रूझर सातशे तर रामिलिजी सुमारे चारशे मैलावर होती.

रॉडनेच्या महत्त्वाकांक्षी प्रयत्नांची, दुर्दैवाने, दर्यासारंग टोव्हीना दादच नव्हती. न जाणो, दर्यासारगांना पाठवलेला सदेश शत्रूने मध्येच उचलला तर आपला ठिकाणा 'बिस्मार्क'ला ज्ञात व्हायचा आणि तिला गाठण्याची सुवर्णसंधी हुकायची, या विचाराने कॅप्टन दालरिपल—हॅमिल्टनने संदेशमौन पत्करले होते. जास्तीत जास्त वेगाने जाणे शक्य व्हावे म्हणून बरोबरच्या क्षीणगती संरक्षक विनाशिकांची सोबत सोडून तो एकटाच पुढे निघाला होता.

अमर्याद महासागरात 'बिस्मार्क'चा शोध करताना अष्टदिशांनी ब्रिटिश नौदलाच्या नौकांनी जे निरनिराळे मार्ग आक्रमिले त्यांचा आराखडा पाहताना, शाईने माखलेल्या पायांनी एखादी माशी शुभ्र कागदावरून इकडेतिकडे सरकत गेली असावी, असे वाटते. किंवा अव्यवस्थित व गुंता झालेल्या जाळ्याची आठवण होते. या विविध रेषांची वळणे आणि त्यांनी साधलेले कोन यात एक बेभानपण प्रत्ययाला येते. शोधामागील व्यापक योजना आणि प्रत्यक्ष शोध करताना झालेली घालमेल, यांचा मूक पुरावाच म्हणायचा तो!

पंचवीस मेची सकाळ झाली तरी 'बिस्मार्क'चा पत्ता लागलेला नव्हता.

त्या तारखेला सकाळी, मागे टाकलेल्या सरक्षक विनाशिकांनी रॉडनेला पुन्हा

गाठले. या विनाशिकांचा दर्यासारंगांना अधिक उपयोग होण्यासारखा आहे असे हॅमिल्टनला वाटले. इतक्यात रिपल्स तेलभरीसाठी निघून जाऊन किंग जॉर्ज द फिफ्थ एकाकी पडण्याची शक्यता सांगणारा टोव्हींनी नौदलप्रमुखांना पाठवलेला संदेश हॅमिल्टनने मध्येच टिपला. आणि सुवार्तेने दर्यासारंगाना दिलासा लाभावा म्हणून आता मुद्दाम संदेश पाठवून हॅमिल्टनने टोव्हींना रॉडनेचा मोक्याचा ठावठिकाणा कळवला.

पण त्या उदास प्रभाती चित्तवृत्ती उल्हसित करण्यासाठी याहून मोठी सुवार्ता दर्यासारंगाना हवी होती. आणि आश्चर्यकारक रीतीने ती मिळालीदेखील !

पंचवीस तारखेच्या सकाळी वातावरण दर्यासारंगांच्या आणि त्यांच्या अधिकाऱ्यांच्या मनस्थितीला साजेसे कुद होते. हजारो मैलांचा महासागर पालथा घालूनही 'बिस्मार्क'चा पत्ता नव्हता. लंडनमध्ये, नौदलाचे मध्यवर्ती कार्यालयदेखील आपले डोके शिणवत असणार, हे टोव्हींना माहीत होते. या नौदल कार्यालयाकडून आता टोव्हींना आणि इतर कर्णधारांना एक संदेश मिळाला. या संदेशावर प्रथम कोणाचा विश्वासच बसेना. आपले संदेश-मौन सोडून 'बिस्मार्क' जर्मन नौदल कार्यालयाला संदेश पाठवत होती; हे संदेश ब्रिटिश नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने मध्येच टिपल्यामुळे 'बिस्मार्क'चा ठावठिकाणा ज्ञात झाला होता ! विश्वास बसू नये अशीच विलक्षण गोष्ट होती ही.

आपण 'बिस्मार्क'वर, तिच्या खलबतखान्यात आहोत अशी कल्पना करू या; म्हणजे यासंबंधी 'बिस्मार्क'ची बाजू आपल्या ध्यानात येईल. ॲडमिरल लटयेन्स आणि कॅप्टन लिंडेमान यांच्या लक्षात एक महत्त्वाची गोष्ट आली : 'बिस्मार्क'ची पुढील उजवी बाजू सफोक व नॉरफोक दोघींकडूनही दुर्लक्षिली जात होती. त्याचा फायदा उठवण्याचे ठरवून 'बिस्मार्क'ने एक मोठे वळण घेतले आणि ब्रिटिश नौकाना चपळाईने झुकांडी दिली.

परंतु ही झुकांडी देऊन आपण खरोखरच पाठलाग करणाऱ्या ब्रिटिश क्रूझर्सच्या कचाट्यातून निसटलो आहोत यावर लटयेन्स-लिंडेमान यांचा विश्वासच नव्हता. आपले नशीब एवढे बलवत्तर असेल, याची त्यांना कल्पनाच नव्हती. सफोक आणि नॉरफोक आता दिसत नव्हत्या ही गोष्ट खरी होती. तरीही रडारच्या साहाय्याने आपल्यावर अजूनही अचूक पाळत ठेवली जात असावी, असे त्यांना वाटत राहिले. नशिबावर हवाला ठेवणे हा जुगारातील पहिला नियम असतो. या नियमाचे पालन करून लटयेन्सने, आपण झुकांडी दिली अशा विश्वासाने पुढे संदेश-मौन पाळले असते तर 'बिस्मार्क' सहीसलामत सुटून दोस्तांच्या अन्नवाहू नौकाची दुर्दशा करू शकली असती.

परंतु ब्रिटिश नौकांची आपल्यावर सावध पाळत आहेच या समजुतीने संदेश-मौन पाळण्याची आवश्यकता लटयेन्सला वाटली नव्हती. म्हणून जर्मन नौदल

कार्यालयाला ती संदेश पाठवत राहिला; आणि हेच संदेश ब्रिटिश नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने टिपले होते. 'बिस्मार्क'ने झुकांडी दिली ही कुवार्ता नौदल कार्यालयाला आधीच कळली होती. त्यामुळे टिपलेले संदेश 'बिस्मार्क'चे आहेत की दुसऱ्याच कोठल्या तरी शत्रुनौकेचे आहेत, अशी शंका नौदल कार्यालयाला आली. कारण असे संदेश देऊन आपला अज्ञात ठावठिकाणा उद्घोषित करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे होते. ते 'बिस्मार्क' करील, यावर ब्रिटिश नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाचा विश्वास कसा बसावा ?...मात्र नौदल कार्यालयाने एक गोष्ट तत्परतेने केली. त्यानी ही महत्त्वपूर्ण वार्ता टोव्हीना कळवली.

टोव्हीना किंग जॉर्ज द फिफ्थवर ही वार्ता सकाळी साडेदहा वाजता मिळाली तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. परतु बातमी खरी की खोटी याचा काथ्याकूट करत ते बसले नाहीत. अस्सल जुगाऱ्यासारखा त्यांनी नशिबावर हवाला टाकला. ते संदेश 'बिस्मार्क'चेच असणार असे त्यांनी गृहीत धरले; आणि मिळालेल्या बातमीच्या आधारे 'बिस्मार्क'ला वेधण्याचा व्यूह रचण्याच्या कामाला ते तत्परतेने लागले.

नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने कळवलेल्या 'बिस्मार्क'च्या ठावठिकाण्यात नेमकेपणा नव्हता. तरीही नाउमेद होण्याचे कारण नव्हते. मिळालेल्या माहितीच्या आधारे, 'बिस्मार्क', तिने ज्या स्थळी झुकांडी दिली त्या स्थळाच्या उत्तरेला गेली असावी, असा अंदाज टोव्हीनी केला; आणि लगोलग महासागरावर विखुरलेल्या, 'बिस्मार्क' हरवल्यामुळे कष्टी झालेल्या आपल्या नौकाना त्यानी 'बिस्मार्क'चा मोघम ठिकाणा सांगितला. मात्र त्यानी कोणत्या हालचाली कराव्या याबद्दल निश्चित सूचना टोव्हीनी त्याना दिल्या नाहीत. त्या त्या कर्णधाराच्या स्वतंत्र कर्तबगारीवर टोव्हींचा पूर्ण भरवसा होता.

या नवीन परिस्थितीमुळे, सफोक आता उलटी फिरून आईसलँडकडे निघाली. टोव्हीच्या काफिल्याला येऊन मिळण्यासाठी निघालेली प्रिन्स ऑफ वेल्स डेन्मार्क सामुद्रधुनीकडे वळली. 'बिस्मार्क' परत उत्तर समुद्राकडे जात असेल तर आपण तिला गाठू शकणार नाही हे रामिलिसच्या कर्णधाराच्या – रीडच्या लक्षात आले; तरीही 'बिस्मार्क'चा मोघम ठिकाणा नव्याने कळल्यामुळे त्याने आपल्या मार्गात थोडा बदल केला. रिअर ॲडमिरल कर्टिस आपल्या काफिल्यातील विमानवाहू व्हिक्टोरियस आणि इतर नौकांसमवेत आईसलँड-फारोमधील चिचोळ्या मार्गाच्या दिशेने निघाला.

सगळ्यांमध्ये दोन बंडखोर निघाले. रिअर ॲडमिरल वेकवॉकरची, 'बिस्मार्क' उत्तरसमुद्राकडे नव्हे तर सरळ ब्रेस्ट बंदराकडे जाते आहे, अशी खात्री झाली होती. आणि त्यामुळे ईशान्येला शोध करण्याची गर्भित सूचना असलेला टोव्हीचा संदेश मिळूनही वेकवॉकरने हट्टाने आपल्या मार्गात फारसा बदल केला नाही. आपल्या

हलगर्जीपणामुळे 'बिस्मार्क' निसटली ही गोष्ट त्याच्या मनाला लागली असावी; स्वतंत्रपणे त्या चुकीचे परिमार्जन करण्याचा विचार कदाचित त्याने केला असावा. मौजेची गोष्ट अशी होती की खुद्द नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयालासुद्धा 'बिस्मार्क' ब्रेस्टकडे जात असावी असे वाटत असावे; कारण एच विभागाच्या जेम्स सॉमरव्हिलना, नौदल कार्यालयाकडून, 'बिस्मार्क' ब्रेस्टला जाते आहे असे गृहीत धरून मार्गात बदल करण्याचा हुकूम मिळाला होता. या हुकुमावर विसंबून त्यानीही टोव्हीचा संदेश मानला नाही. रॉडनेवर कॅप्टन दालरिंपल-हॅमिल्टनलाही कळून चुकले की उत्तरसमुद्राकडे जाणाऱ्या 'बिस्मार्क'ला गाठणे आपल्याला कोणत्याही परिस्थितीत शक्य नाही. शिवाय ती युरोपच्या पश्चिम किनाऱ्याकडे वळली असावी, असा त्याचा अदाज होता. इतक्यात त्याला नौदल कार्यालयाची 'बिस्मार्क' ब्रेस्ट वा सेंट नाझेर बदरात जाते आहे असे गृहीत धरून त्याबरहुकुम हालचाल करण्याची सूचना मिळाली. ब्रेस्टला जाणाऱ्या 'बिस्मार्क'ला गाठणे त्याला सहज शक्य होते! एडिंबर्ग क्रूझरवर कमोडोर ब्लॅकमनदेखील स्थूलमानाने ब्रेस्टच्या दिशेला निघाला.

गहाळ झालेली 'बिस्मार्क' भाग्यवशात अचानक सापडली होती. सावज पुन्हा निसटू नये म्हणून शिकारी सावधपणे पुढे सरसावत होते

या व्यापक सागरी मोहिमेचा एक लक्षणीय विशेष असा की नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने नेहमीच शत्रूच्या हालचालीची दूर अटलांटिकमध्ये असलेल्या आपल्या नौकांना नेमकी माहिती दिली. इतकेच नव्हे तर टोव्हीच्या प्रत्यक्ष संपर्का-पलीकडे असलेल्या नौकाना नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने वेळोवेळी दिलेले आदेश दर्यासारग टोव्हीच्या सकल्पित योजनेच्या कार्यवाहीला पूरक ठरले.

ब्रिटिश नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या अधिकाऱ्यांपुढे केवळ 'बिस्मार्क'-चीच मोहिम नव्हती. त्या सुमारास जर्मनांनी क्रीटवर हल्ला चढवला होता; त्याच्याशी लढण्यात भूमध्यसमुद्रातील काफिला गुतला होता. मात्र ही गोष्ट खरी होती की अधिकाऱ्याच्या लेखीदेखील 'बिस्मार्क'च्या मोहिमेला अग्रहक्क प्राप्त झाला होता; आगळे महत्त्व प्राप्त झाले होते. कारण "'बिस्मार्क'ला जलसमाधी द्या' अशी पंतप्रधान चर्चिल याची खास आज्ञा होती.

'बिस्मार्क'च्या संभाव्य हालचालीचा आणि हेतूचा विचार करताना ब्रिटिश नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यात तीव्र मतभेद निर्माण झाले होते.

सफोक आणि नॉरफोकना झुकांडी दिल्यावरोबर ॲडमिरल लटयेन्सने पूर्वदिशेचा मार्ग पत्करला होता. जर्मन नौदल कार्यालयाला 'बिस्मार्क'ने पाठवलेले संदेश ब्रिटिश नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने टिपले तेव्हादेखील 'बिस्मार्क'ची दिशा तीच होती. त्यामुळे ती डेन्मार्क-सामुद्रधुनीमधून आल्या मार्गाने परत जाण्याचा

प्रयत्न करत असावी असा समज दृढ झाला. या प्रसंगाला तोंड देण्याची कामगिरी नौदल कार्यालयाने किनारादलावर सोपवली होती. तब्बल सात तास 'बिस्मार्क' पूर्वेला जात होती; त्यामुळे उत्तर समुद्राकडे जाऊन अखेर ती हूडवरील विजयाचे पारितोषिक स्वीकारण्यासाठी जर्मनीला परतणार अशी बऱ्याच अधिकाऱ्यांची खात्री झाली होती. इतर काही अधिकाऱ्यांना मात्र ते पटत नव्हते. आणि या दोन पक्षात मतैक्य होणे अवघड झाले होते.

सरतेशेवटी या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी फर्स्ट सी लॉर्डनी नाविक हालचालींचे नियंत्रक (Director of Naval Operations) कॅप्टन एडवर्ड्स आणि योजना-कार्यवाह ( Director of Plans ) कॅप्टन डॅनियल या दोघांना पाचारण केले. वेगवेगळ्या दालनात त्यांची रवानगी करण्यात आली आणि हाती असलेल्या सर्व माहितीच्या आधारे 'बिस्मार्क'च्या संभाव्य मार्गक्रमणाचा अंदाज स्वतंत्रपणे करण्याची आज्ञा त्यांना करण्यात आली.

एक तास झाला. कॅप्टन डॅनियल आपल्या निर्णयासह फर्स्ट सी लॉर्डसमोर दाखल झाला. 'बिस्मार्क' ब्रेस्ट वा सेंट नाझेर बंदराकडे जात असावी, असा निर्णय डॅनियलने दिला. आपल्या निर्णयामागील कारणमीमांसा त्याला करावी लागली. त्याच्या मते, 'बिस्मार्क' जायबंदी झाली असली तरी तिची स्थिती अगतिकपणे जर्मनीला परतण्याइतकी गंभीर नव्हती. शिवाय जर्मनीला जाण्यात दोस्तांच्या विमानहल्ल्यांचे भय होतेच. फ्रेंच बंदरात तिला जर्मन विमानदलाची मदत मिळणे शक्य होते. तसे न करता अमर्याद महासागरावरसुद्धा ब्रिटिशांना चकवणे तिला शक्य होते. आणि दोन हात करण्यासाठी सामोऱ्या येणाऱ्या ब्रिटिश नौकांचे भय 'बिस्मार्क' बाळगेल असे मागील चकमकीवरून तरी मानता येत नव्हते.

फर्स्ट सी लॉर्डबरोबर दुसरे अनेक तोलमोलाचे अधिकारी होते. त्यांच्यापैकी काही जणांना डॅनियलचा निर्णय मान्य नव्हता. या मुत्सद्दी आणि अनुभवी अधिकाऱ्यांच्या भेदक उलटतपासणीला डॅनियल उत्तरे देत होता. डेन्मार्क–सामुद्रधुनीमध्ये आता उरलेले ब्रिटिश आरमार कमकुवत होते; त्याला धुडकावून 'बिस्मार्क' सुखरूप जर्मनीला जाऊ शकली असती असा विरोधकांचा युक्तिवाद होता. पण कॅप्टन डॅनियलने आपला निर्णय बदलला नाही. वातावरण तंग झाले होते

नंतर आला कॅप्टन एडवर्ड्स. त्यानेही डॅनियलप्रमाणेच निर्णय दिला. कारणंही जवळजवळ तीच सांगितली. परंतु एडवर्ड्सच्या निर्णयाचे स्वागत अधिकाऱ्यांनी अगदी वेगळ्या प्रकारे केले. कारण तेवढ्यात, 'बिस्मार्क' अकस्मात आपली दिशा संपूर्ण बदलून सरळ ब्रेस्टच्या रोखाने जात आहे, अशी बातमी येऊन थडकली होती!

कॅप्टन डॅनियल आणि कॅप्टन एडवर्डस यांचा अदाज तंतोतत खरा होता. त्यांचा आणि दर्यासारंग टोव्हीची सूचना डावलून स्व-तंत्राने चालणाऱ्या बडखोरांचाही !

दरम्यानच्या काळात किनारादल काही स्वस्थ बसले नव्हते. 'बिस्मार्क' हरवल्यावर किनारादलाच्या अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे आपले आडाखे बांधून तिचा शोध चालवला होता. योगायोगाची गोष्ट अशी की डॅनियल आणि कॅप्टन एडवर्डस प्रमाणे किनारादलाच्या अधिकाऱ्यांचाही अंदाज 'बिस्मार्क' ब्रेस्ट वा सेंट नाझेरच्या रोखाने कूच करत आहे असाच होता. परंतु नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाला जेव्हा त्यानी आपला अंदाज कळवला तेव्हा कार्यालयाने त्याला दुजोरा दिला नाही. बहुधा नौदल कार्यालयाच्या मनाची तोपर्यंत तयारी झालेली नसावी.

नौदल कार्यालयाच्या अहवालावरून 'बिस्मार्क' ब्रेस्ट वा सेंट नाझेर येथे जात असावी अशी अखेर दर्यासारगाचीही खात्री पटली. पण तोपर्यंत त्यांच्या जीवाची नुपती घालमेल चालली होती. 'बिस्मार्क' उत्तरसमुद्राकडे जाते आहे असे गृहीत धरूनच त्यांनी शोध चालवला होता. त्यांचा हा अदाज लटका ठरला होता. आणि मध्यवर्ती नौदल कार्यालयाचा निर्णायक अहवाल त्यांना मिळाला तोपर्यंत सध्याकाळचे सहा वाजून गेले होते. नशीब आणखी उशीर झाला नव्हता; नाहीतर टोव्हीचा पाठलाग करणारा काफिला, भलतीकडेच गेला असता. नौदल कार्यालयाचा अहवाल तातडीने मिळता तर टोव्हीनी 'बिस्मार्क'ला तेव्हाच गाठलें असते. त्या दिवशी सकाळी आठ वाजता टोव्हीची किंग जॉर्ज द फिफ्थ 'बिस्मार्क'पासून अवघ्या शंभर मैल अंतरावरून गेली होती ! रॉडने आणि एडिंबर्ग तर त्यावेळी 'बिस्मार्क'-पासून अनुक्रमे पन्नास व पंचेचाळीस मैल अतरावर होत्या !

नौदल कार्यालयाचा हा अहवाल मिळताच दर्यासारंगांनी मोहिमेची पुनर्रचना केली. नौदल कार्यालय आणि प्रत्यक्ष मोहिमेत भाग घेणारा टोव्हीचा काफिला याच्यातील घनिष्ठ सहकार्यामुळेच टोव्हीना संदेश-मौन राखता आले. या गोष्टीचा 'बिस्मार्क'च्या शिकारीत फार मोठा उपयोग झाला.

'बिस्मार्क'च्या नेमक्या मार्गावर पुन्हा निघालेल्या टोव्हीचा काफिला आता रोडावला होता. त्यांच्या काफिल्यातील बहुतेक नौका चुकीच्या दिशेने गेल्या होत्या; आणि प्रिन्स ऑफ वेल्स, व्हिक्टोरियस व तिच्या सोबतीच्या संरक्षक क्रूझर्स आणि नॉरफोक यांचा तेलसाठा संपत आला होता.

यातील एक नॉरफोक सोडून बाकीच्यानी मोहिमेतून काढता पाय घेतला. आपल्या अधिकारातील दलाच्या पहाऱ्यातून 'बिस्मार्क' निसटली याचे शल्य वेकवॉकरच्या मनात सलत होते. त्यामुळे इतर कोणत्याही गोष्टीचा विचार करायला तो तयार नव्हता. 'बिस्मार्क'शी जणु त्याने खासगी वैर माडले होते. म्हणून तेलसाठ्याची तमा न बाळगता नॉरफोक त्याने ब्रेस्टच्या दिशेने पिटाळली होती.

खुद्द किंग जॉर्ज द फिफ्थ या ध्वजनौकेवरील तेलसाठ्याची स्थितीही चिंताजनक होती. 'बिस्मार्क' अजून कितीतरी दूर होती. कमाल वेगाने तिला गाठण्याचा प्रयत्न करण्यामध्ये तेलसाठा जलदीने संपण्याची भीती होती. त्यामुळे तिचा वेग पंचवीस नॉट इतकाच ठेवणे अपरिहार्य होते. पण या वेगाने 'बिस्मार्क'ला गाठणे शक्य होते काय ?

एका कोड्याचे मात्र समाधानकारक उत्तर देता येत नाही. डॅनियल आणि एडवर्डस या दोघांनी एकच ठाम निर्णय दिल्यानतरही नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने दर्यासारंग टोव्हींना चुकीच्या ईशान्य दिशेला तब्बल पाच तासपर्यंत का भरकटू दिले ? त्यामुळे टोव्हींचा बहुमोल वेळ फुकट गेला, तेल वाया गेले, पवित्रा चुकला. वास्तविक 'बिस्मार्क' ब्रेस्ट वा सेंट नाझेर येथे जाईल अशीच सारी चिन्हे होती. डॅनियल आणि एडवर्डसप्रमाणेच अंदाज किनारादलाने स्वतंत्रपणे केला होता. नौदल कार्यालयातील काही बड्या अधिकाऱ्यांनाही हा अंदाज योग्य वाटत होता.

· आणि तरीही, 'बिस्मार्क'चा शोध भलत्या दिशेला करणाऱ्या दर्यासारंग टोव्हींना त्या दिवशी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून काही मार्गदर्शनच लाभले नाही. लंडनमधील कोणातरी बड्या, अहंमन्य असामीच्या आंधळ्या हट्टामुळे असे झाले असावे, असा अंदाज करावा लागतो.

'बिस्मार्क'चा हेतु आणि पवित्रा स्पष्ट झाला तरी टोव्हींनी तिला गाठून युद्धात खेचण्याचा संभव पूर्वीपेक्षा कमी झाला होता. जमेच्या बाजूची गोष्ट अशी होती की किनारादलाच्या चलाख विमानांनी 'बिस्मार्क'चा सतत शोध चालवला होता; त्यामुळे 'बिस्मार्क' सापडणे आणि तिचा निश्चित ठिकाणा ज्ञात होणे हा केवळ कमीअधिक कालावधीचा प्रश्न होता. शिवाय 'बिस्मार्क' आणि ब्रेस्ट व सेंट नाझेर यांच्यामध्ये आता ब्रिटिश पाणबुड्या गस्त घालत होत्या.

अजून तरी सर्वांच्या आधी फक्त जुनाट रॉडनेच 'बिस्मार्क'ला गाठू शकत होती. परंतु कॅप्टन दालरिंपल–हॅमिल्टनने पुन्हा सक्त संदेश-मौन पाळण्याचा निर्णय घेतल्यामुळे रॉडने 'बिस्मार्क'ला गाठण्याचा जिवापाड प्रयत्न करत आहे याहून अधिक काही दर्यासारंगाना समजणे अशक्य होते. जुनाट रॉडनेचा अद्ययावत 'बिस्मार्क'पुढे काय पाड लागणार होता ?

सुदैवाने सॉमरव्हिलचा एच् विभाग या नावाने ओळखला जाणारा काफिला संभाव्य रणक्षेत्रापासून आता दूर नव्हता. 'बिस्मार्क'ला गाठण्यासाठी त्याला चोवीस तासांचा अवधी पुरेसा होता. या काफिल्यात रिनाऊन, शेफिल्ड आणि विमानवाहू आर्क रॉयल या नौका होत्या. त्यांच्यापैकी रिनाऊन आणि शेफिल्ड यांच्या तोफखान्याचा 'बिस्मार्क'विरुद्ध फारसा उपयोग होण्याची शक्यता नव्हती. पण आर्क रॉयलवरील विमानांची गोष्ट वेगळी होती. त्यांचे वैमानिक अत्यंत कुशल आणि

अनुभवी होते. व्हिक्टोरियसवरील नवशिके वैमानिक जर ' बिस्मार्क 'वर जुजबी का होईना, प्रहार करू शकतात तर आर्क रॉयलवरील कसलेले वैमानिक ' बिस्मार्क 'वर प्रहार करून, तिची गती रोखून, किंग जॉर्ज द फिफ्थला, ' बिस्मार्क 'ला गाठायला जरूर तो अवसर देऊ शकतील, अशी आशा जरूर बाळगता येण्यासारखी होती. दर्यासारंग टोव्हीनी आता सारा भरवसा आर्क रॉयलवर टाकला होता.

' बिस्मार्क 'कडे झेपावणाऱ्या टोव्हीच्या काफिल्याला जर्मन पाणबुड्यांचा आणि विमानाचा मोठाच धोका होता. किंग जॉर्ज द फिफ्थला आता संरक्षक विनाशिकांची सोबत नव्हती. रॉडनेची शिलेदारीदेखील एकांडीच होती.

सूर्य मावळला आणि एका अत्यंत उदासवाण्या दिवसाचा अस्त झाला.

(क्रमशः)

---

## एक ते शंभर

पोलंडमधील एक श्रेष्ठ अभिनेत्री अमेरिकेत आली असता तिला एका मोठ्या पार्टीला बोलावण्यात आले. तिथल्या प्रतिष्ठित व्यक्तींची ओळख करून दिल्यानंतर तिने आपल्या अभिनयाचा एखादा पैलू दाखवावा अशी सर्वांनी आग्रहाची विनंती केली. परंतु तिला इंग्रजी येत नव्हते आणि जमलेल्या समाजाला पोलीश भाषा अवगत नव्हती.

तथापि त्या अभिनेत्रीने पोलीश नाटकातील एखादा भाग करून दाखवावा असे ठरले.

थोड्याच वेळात त्या अभिनेत्रीने करुण रसाने भरलेला एक उतारा म्हणून दाखविला आणि तो पहात व ऐकत असता पोलीश भाषेचा गंध नसलेल्या त्या समाजातील व्यक्तींच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

अभिनेत्रीच्या कौशल्याची तारीफ करताना सर्वांनी विचारले. ' हा प्रवेश कोणत्या पोलीश नाटकातील होता ? "

अर्धस्फुट स्मित करीत त्या अभिनेत्रीने सांगितले, ' कुठल्याच नाटकातील उतारा घेतलेला नसून मी पोलीश भाषेतील एक ते शंभर अंक म्हणून दाखविले. '

— इंद्रधनु

---



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ▫ कायदा बोकड नसतो

कायदा गाढव असो की नसो, तो बोकड मात्र नाही असे सिद्ध झाले आहे. परवा वर्तमानपत्रात वाचले का जर्मनीत एका तरुणाने बीटल्-छाप केस कापल्या-बद्दल त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले होते, पण कोर्टाने त्याला परत नोकरीवर घ्यायला लावले आहे. नोकरीच काय पण कुठलेही काम नीट करणे किंवा न करणे हे डोक्यावरच्या केसावर अवलंबून नसून डोक्यामधल्या मेंदूवर अवलंबून असते हा एक क्षुल्लक मुद्दा सोडला तरी आपल्या ऑफीसचे काम बीटल्-छाप भांग पाडणारा नीट करू शकणार नाही किंवा हिप्पी-छाप दाढी ठेवणारा करू शकेल हे कुठला बॉस कुठल्या आधारावर ठरवू शकेल? आमच्या शेजारची शकू ऑफिसात जाताना कधी दोन शेपटे घालते, कधी नायलॉनचा भुसा भरलेला प्रशस्त अंबाडा घालते, कधी पोनी टेल म्हणविणारी उंदराची शेपटी सोडते, तर कधी गगनाला गवसणी घालणारा इंग्लिश डोम घालते. पण म्हणून तिच्या कामात फरक पडतो काय? अर्थात् नाही. पोनीटेल घालून ती कामात जेवढ्या चुका करते तेवढ्याच चुका इंग्लिश डोम घालूनही करण्याचा निःपक्षपातीपणा ती कटाक्षाने दाखविते.

## ▫ सौभाग्यकांक्षिणी कुत्री

हिंदुस्थानातल्या वधुवरसूचक मंडळाचे काम अमेरिकेत एक कॉम्प्यूटर करतो ही बातमी आता जुनी झाली. ताजी बातमी म्हणजे पाळीव कुत्र्यांसाठी 'अनुरूप' जोडीदार शोधून काढण्याचे कामही अमेरिकेत एक कॉम्प्यूटर करू लागला आहे. म्हणजे कुत्र्याचे जिणे यापुढे 'नांदा सौख्यभरे' या ऑटोमॅटिक आशीर्वादाप्रमाणे चालणार. आता मोत्या अन् चंपी एकमेकांना किती अनुरूप आहेत हे कोणत्या गोष्टीवरून हा कॉम्प्यूटर ठरवीत असेल बरं? मला वाटते छत्तीस गुणांपैकी निदान पुढील महत्त्वाच्या गुणांचा तरी यांत्रिक मेळ बसविण्यात येत असावा: मोत्या व चंपी एकाच सुरात भुंकतात की नाही? लांगूलचालनाच्या विद्येत दोघेही एखाद्या होळ घातलेल्या मंत्र्याइतकेच प्रवीण आहेत की नाही? मोत्या हाडूक चघळण्या-

इतका बद्रुक तर चंपी डॉग-बिस्किट आवडण्याइतकी आधुनिक असे विजोड जोडपे तर होणार नाही? मोत्या रस्त्यावर कुत्र्याचे जिणे जगणारा तर चपी समर्थाघरचे श्वान एवढी दोघात सांपत्तिक तफावत तर नाही? अन् मुख्य म्हणजे लग्नाला उभा राहिलेल्या मोत्याने एखाद्या आज्ञापालन-स्पर्धेत बक्षीस मिळविले आहे की नाही?


## ◻ कुमारी कोकाकोला

आंध्रप्रदेशात एका शेतकऱ्याने आय्. आर. ८ जातीच्या भाताची लागवड केल्याने त्याला सुबत्ता प्राप्त झाली म्हणून त्याने आपल्या मुलाचे नावही आय. आर. ८ ठेवले अशी माहिती तामिळनाडूच्या अन्नमंत्र्यांनी नुकतीच दिली. आता नावात काय आहे हा वाद शेक्सपियरइतका जुना असला तरी नावाचा हा 'खाऊ की गिळू' प्रकार अजबच म्हटला पाहिजे. कुमार आय. आर. ८ म्हटला की कुमारी बासमती का नको? अन् कॅनडियन किंवा मेक्सिकन गहू पेरणाऱ्या किंवा खाणाऱ्या मंडळींनी चिरंजीव ब्रेडकुमार किंवा कुमारी चपातीचे पाळण्यातले नाव काय ठेवायचे? याच्याही पुढे जाऊन आमच्या कोपऱ्यावरचा कोल्ड्रिंकवाला आपल्या मुलीचे नाव मिस् कोकाकोला केव्हा ठेवणार याची वाट पहायला हवी. आता आमच्या शेजारच्या एका आधुनिक जोडप्याने आपल्या मुलाचे नाव जॉय ठेवले आहे खरे, पण ते जॉय मुकर्जी या सिनेमा-नटावरून ठेवले आहे की जॉय आइस्क्रीमवरून ठेवले आहे याचा उलगडा झालेला नाही.

## ◻ 'दो या तीन कबूतर, बस!'

जर्मनीतल्या हॅनोवर शहरात म्हणे कबुतरांची संख्या इतकी वाढली आहे की तेथल्या नगरपालिकेने कबुतराना संततिनियमनाच्या गोळ्या चारण्याचे ठरवले आहे. म्हणजे अगदी 'दो या तीन कबूतर, बस!' अशीच पाळी येणार म्हणायची. पण या गोळ्या कबूतर समाजात लोकप्रिय करताना 'कुटुंब लहान, सुख महान' हा सरकारी मंत्र त्यांना शिकविण्याची सोय करण्यात आली आहे काय? जेथे जेथे म्हणून उलटा टांगलेला लाल त्रिकोण दिसेल तेथे तेथे संतति-नियमनावर सल्ला मिळू शकेल हे तरी सौ. कबूतर याना माहीत आहे काय? ते असो, संतति-नियमनाची एवढी भरारी भारताने भूतकाळातही कधी घेतली नव्हती हे नशीब. कारण नळराजाने हंसाला पकडल्यावर त्या बेट्याने 'कांता काय वदो नवप्रसव ती साता दिसांची तशी' अशा सबबीवर सुटकेची याचना केली होती, तेव्हा नळाने त्याला सोडून द्यायच्या ऐवजी पकडून, थेट फॅमिली प्लॅनिंग सेंटरवर नेले असते तर नळ-दमयंती आख्यान कसे घडले असते?

◻ ◻ ◻



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१८ ते २४ एप्रिल १९७०

**मेष :** या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला भोगकारक आहे. रवी-शनी-बुध-शुक्र पहिले (ता. २२ नंतर शुक्र दुसरा), मंगळ दुसरा, राहू अकरावा व गुरु सातवा असे सर्व ग्रह शुभ स्थानात आहेत. विद्याभ्यासात थोडा त्रास. संततीकरता खर्च होईल. अचानक धनलाभाचा योग आहे. धनस्थानातील मंगळ-शुक्र ता. २४ ला अनपेक्षित धनलाभ घडवून आणतील. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे ते तितकेसे चांगले नाही. ता. १९।२० ला घराच्या भानगडी उत्पन्न होतील. ता. २१।२२ ला भागीदारांकडून मनस्वास्थ्य बिघडण्याजोग्या चुका घडतील. सरकारी कामात अपयश येईल. उद्योगधंदा चांगला चालेल. घराची कॉन्ट्रॅक्टस् व वहातुकीच्या धंद्यात फायदा होईल. प्रवासयोग येईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १९।२०।२४

**वृषभ :** या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सुखदायक आहे. पहिला मंगळ, बारावे रवी-बुध-शनी-शुक्र (ता. २२ नंतर शुक्र पहिला), राहू दहावा व गुरु सहावा असे मंगळ-राहू खेरीज बाकी ग्रह अशुभ स्थानात आहेत. पोटाचे विकार उत्पन्न होतील. शत्रूंचा त्रास नाहीसा होईल. सरकारी कामात यश मिळेल. २२ नंतर शुक्र-मंगळ योगाने धनलाभ चांगला होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ ह्या घरातून आहे ते बरे आहे. विद्याभ्यासात यश. लेखनास दिवस चांगले आहेत. सुखनाश होईल. भावंडाकडून त्रास होईल. ता. १८ ला मनस्वास्थ्य बिघडेल. ता. २१।२२।२३ ला धनलाभ चांगलाच होईल. उद्योगधंदा बरा चालेल. तेलाचा व प्रसाधनाचा धंदा करणारांना अमाप फायदा होईल. प्रेमाच्या फंदात सापडण्याचा योग आहे. मुलांकडून प्रेमयाचना केली जाईल. २७ ते ३२ या वयाच्या व्यक्तींना ह्या योग जास्त जोरदार आहे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे व, ब, न, य, आ, इ, उ, ओ, ए, ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही हीच फळे मिळतील. शुभ तारखा २१।२२।२३।२४

**मिथुन :** या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला सुखकारक आहे. अकरावे रवी-बुध-शनी-शुक्र (ता. २२ नंतर शुक्र बारावा), मंगळ बारावा, गुरु पाचवा व राहू नववा असे सर्वच ग्रह शुभ स्थानात आहेत. संततीचा उत्कर्ष, विद्याभ्यासात फायदा व यश. धार्मिक कामाकरता प्रवासयोग. उद्योगधंदा चांगला चालेल. चंद्राचे

भ्रमण ४।५।६ स्थानातून आहे ते फारच चांगले आहे ता. २३।२४ ला अचानक धनलाभ होईल. शत्रूंचा संपूर्ण नाश होईल. सर्व सप्ताहच उत्साहवर्धक आहे. ता. १९।२० घरासंबधी कामे उरकावी. सरकारी व सहकारी कामात संपूर्ण यश. मातुल घराण्याकडून व पत्नीकडून सर्व प्रकारचे साहाय्य मिळेल. ज्या व्यक्तीची अगर संस्थाची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, भ, घ, छ, थ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही हीच फळे मिळतील. शुभ तारखा १९।२०।२१।२४

कर्क : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला अनिष्ट आहे. दहावे रवी-बुध-शनी-शुक्र (शुक्र २२ नंतर ११ वा), मगळ अकरावा, गुरु चौथा आणि आठवा राहू. मगळ हा एकच एक कर्क लग्नाचा राजयोगकारक ग्रह चतुर्थेश व एकादशेश शुक्राबरोबर आहे तो सोडून बाकी सर्व ग्रह अशुभ स्थानातून भ्रमण करीत आहेत. उद्योगधद्यात अपयश, अनेक अडचणी, सरकारी कामात अपयश, प्रवासात अपघात. फक्त एकच योग चांगला म्हणजे स्त्रियांकडून सर्व प्रकारची मदत होईल. चंद्राचे भ्रमण ३।४।५ घरातून आहे ते चागले आहे. नवीन नाटके पुढे आणण्याला व त्यात कामे करण्याला दिवस चांगले आहेत. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना अमाप फायदा होईल. शास्त्रीय अभ्यासात प्रगती. मेडीकल व्यवसायातील लोकांना सुयश. ता. २३।२४ ला हा योग येईल. सुखरूप बाळंतपणाच्या केसेस हातून होतील. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ज, स, ख, ह, ड ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील शुभ तारखा १९।२०।२३।२४

सिह : या सप्ताहातील ग्रहमान सिह राशीला नरमगरम असे आहे. नववे रवी-बुध-शनी-शुक्र (शुक्र ता. २२ नंतर दहावा), मंगळ दहावा, राहू सातवा व गुरु तिसरा असे राहू शिवाय सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. धनलाभ चांगला होईल. विद्याभ्यासात यश येईल. दशमात आलेले मगळ-शुक्र सुखसमृद्धी करतील. धदा-व्यवसाय उत्तम चालेल मानमान्यता मिळेल. प्रवासापासून फायदा होईल. धार्मिक कामाकरता प्रवास घडेल. चद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे ते चांगले आहे. ता. १८ ला मनस्ताप होऊन दिवस त्रासात जाईल. ता. २१।२२।२३ हे दिवस पराक्रमाला व अचानक धनलाभाला चांगले आहेत. सार्वजनिक कामात यश प्राप्त होईल. नवीन व्यवसाय सुरू करण्यास काळ चांगला आहे. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट आणि ठ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २१।२२।२३।२४

कन्या : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला धनलाभ घडवून आणणारे आहे. आठवे रवी-बुध-शनी शुक्र (शुक्र ता २२ नतर नववा), मंगळ नववा, राहू सहावा व दुसरा गुरु असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. अचानक धनलाभ ता. २१।२२ ला होईल. लॉटरीचे तिकीट या दिवशी घ्यावे. शुक्र-मगळ युती गुरुवार-शुक्रवारी भाग्योदय होणारे योग आणतील. विवाहाची बोलणी होण्याचा उत्तम योग आहे. सरकारी कामात मुदत मागून घ्यावी. घरातील वडील माणसे आजारी

पडतील. चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे ते चांगले आहे. मित्रपरिवार येऊन आनंदीत करील. संततीकरता त्रास सोसावा लागेल. शत्रुनाश होईल. ज्या व्यक्तीची नावे क, प, द, ध, च, भ, घ, छ, थ, फ, क्ष, ज्ञ ह्या अक्षरानी सुरू असतील त्याना वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २१।२२।२३।२४

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला यशदायक आहे. पहिला गुरु, पाचवा राहू, सातवे रवी-बुध-शनी-शुक्र (२२ नतर शुक्र आठवा), मगळ आठवा असे सर्व ग्रह शुभयोगात आहेत. अष्टमेश, धनेश, लग्नेश व सप्तमेश अष्टमात एकत्र आहेत. हा योग स्त्रियांना अचानक धनलाभ मिळवून देईल. पण भागीदारांशी विनाकारण तीव्र मतभेद होईल. सरकारी कामात विशेषकरून फौजदारी कामात यश मिळेल. ता. २१।२२ ला प्रवास टाळावा. चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे ते तितकेसे चागले नाही. ता. १९।२० ला अपमान होण्याचा योग आहे. हा काळ सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना जास्त त्रासदायक आहे व इंडिकेटवाल्यांना यशदायी आहे. ज्या व्यक्तीची अगर सस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ ता. २१।२२।२३।२४

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला प्रतिकूल आहे. चौथा राहू, बारावा गुरु, सहावे रवी-बुध-शनी-शुक्र (२२ नंतर सातवा), व बारावा गुरु असे सर्वच ग्रह अशुभ योगात आहेत. विद्याभ्यासात अपयश, सततीकडून त्रासदायक वर्तन. मित्रमडळीकडून शत्रुत्व होईल. सार्वजनिक कामात विनाकारण वाईटपणा येईल. गृहस्थितीतही असमाधान राहील. फक्त एकच शुभ योग म्हणजे पत्नीकडून अगर पतीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या घरातून होत आहे ते बरे आहे. ता. १९।२० हे दिवस बरे जातील. मागील येणे असलेले पैसे प्रत्यक्ष हातात पडतील. ता. २१।२२ या दिवसात सर्व बाजूनी अडचणी निर्माण होतील. रक्तदाब वाढण्याचा अगर पोटाच्या विकाराचा त्रास जाणवेल. सर्वावर एकच एक शुभ योग गुरुमहाराजाची शुभदृष्टी राहू व दुसऱ्या चतुर्ग्रहीवर आहे. ती सर्व अडचणींची तीव्रता कमी करील. ज्या व्यक्तींची अगर सस्थाची नावे न, य, ष, ब, आ, ई, उ, ओ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १९।२०।२३।२४.

धन : या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला सौख्यकारक आहे. रवी-बुध-शनी-शुक्र पाचवे (शुक्र २२ नतर सहावा), राहू तिसरा, मगळ सहावा व गुरू अकरावा असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. अचानक धनलाभ, विद्येत भरघोस यश, मित्रांकडून सर्व प्रकारची मदत होईल. पराक्रम घडण्याचा योग आहे. विवाहाची अचानक मागणी येईल. चद्राचे भ्रमण १०।११।१२ ह्या स्थानातून आहे. ते चागले आहे. १९।२० शुभ कार्याची तयारी होईल. घरात पाहुणे आल्यामुळे आनदीआनद होईल. २१।२२ ला अपेक्षित धनलाभ घडेल. ता. १८ ला मनस्वास्थ्य बिघडेल. नोकरीत बढती मिळेल. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे क, प, भ, घ, छ, थ

ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांना वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १९।२०।२१।२२

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला ता. २२ नंतर सौख्यदायक आहे. रवी-बुध-शनी-शुक्र चौथे (२२ नंतर शुक्र पाचवा), मंगळ पाचवा, राहू दुसरा व गुरू सातवा असे राहूशिवाय सर्व ग्रह शुभ स्थानात आहेत. शनी लग्नेश चतुर्थात आहे. तो सुखाला थोडा कमीपणा आणील. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ स्थानातून आहे ते फार चांगले आहे. ता. १९।२० ला प्रवास योग आहे विद्येत यशप्राप्ती. संततीचा उत्कर्ष होईल. ज्याचे वय २७ ते ३२ असेल त्यांचे प्रेमविवाह जमतील. ता. २१।२२ ला हा योग विशेष चांगला आहे. अचानक धनलाभ होईल. सरकारी कामात यश प्राप्त होईल. घराचे व जमिनीचे प्रश्न मनाप्रमाणे सुटतील. नवीन उद्योग हातात घेण्यास काळ चांगला आहे. ज्या व्यक्तीची अगर संस्थाची नावे ज, स, ख, ह, ड ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १९।२०।२१।२२

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला भोगदायक आहे. तिसरे रवी-बुध-शनी-शुक्र (२२ तारखेनंतर शुक्र चौथा), मंगळ चौथा, राहू पहिला आणि गुरू नववा असे सर्व ग्रह शुभ स्थानात आहेत. ता. १८ ला पैशाच्या व्यवहारात घोटाळा होईल. प्रवासाचा योग येईल. त्यात अत्यंत फायदा होईल. भावंडाकडून त्रास होईल. सरकारी व सहकारी कामात यश मिळेल. घरात शुभ कार्य जमून येईल. मंगळवार व शुक्रवार या दृष्टीने चांगले जातील. फॅन्सी जिनसांचा धंदा करणारे लोक यशस्वी होतील. चंद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे ते बरे आहे. ता. १९।२० ला शत्रू उत्पन्न होतील; परंतु त्यांचाच पराभव होईल. ता. २१।२२ ला विद्यार्थ्यांना व साहित्यिकाना भरघोस यश येईल. ता. २३।२४ ला व्यवसाय-उद्योगात उत्तम प्रगती होईल. ज्या व्यक्तीची अगर संस्थाची नावे ग, श, म, ट, ठ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २१।२२।२३।२४

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला शुभाशुभ फल देणारे आहे. दुसरे रवी-बुध-शनी-शुक्र (ता. २२ नंतर शुक्र तिसरा), मंगळ तिसरा, राहू बारवा आणि गुरू आठवा असे मंगळ-शुक्राखेरीज सर्व ग्रह अशुभ स्थानात आहेत, पैशाची अडचण येईल. गुरू वाईट असलेल्या सर्व ग्रहावर पाहात आहे, त्यामुळे तीव्रता कमी होईल. शारीरिक त्रास होईल. सरकारी कामात अपयश येईल. विवाहाचे बेत ता. १९।२० ला ठरतील. चद्राचे भ्रमण ७।८।९ स्थानातून आहे. ते मध्यम आहे. ता. २१।२२ ला अचानक धनलाभ होईल. हातून पराक्रम होईल. धाडसाची कामे सफल होतील. शुक्रवारी जे जे काम हातात घ्याल त्यात फायदा होईल. घरात मौल्यवान वस्तूंची खरेदी होईल. ज्या संस्थांची अगर व्यक्तींची नावे क, प, द, ध, च, फ क्ष ज्ञ. भ; घ, छ, थ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ ता. २१।२२।२४

□ □ □

 [पृष्ठ ५ वरून]

मुंबईतल्या सामाजिक विकृतीचा. केवळ बायका ओठांना रंग लावतात म्हणून काय त्यांना 'सोशल वर्क' करता येत नाही. किंवा इंपोर्टेड कारमधून फिरल्यामुळे श्रीमंतांना समाजसेवेचा अधिकार पोचत नाही !

संपादक महाराज, समाजसेवेचे एवढे उदात्त नमुने समोर दिसत असताना मुंबईतल्या राजकारणावर खोटे नाटे काही लिहायला मला कंटाळा येणार नाहीतर काय ? राजकारणात अशा कित्यक गोष्टी घडतात की ज्या प्रसिद्ध केल्या जात नाहीत आणि प्रसिद्ध करायच्या नसतात. मग त्यापेक्षा या समाजसेवकांवर लिहिलेलं काय वाईट ? आता परवाच्या मुंबईच्या महापौरांच्या निवडणुकीचच घ्या. महानगरपालिकेच्या समित्याच्या निवडणुकीच्या वेळी इंडिकेट कॉंग्रेस आणि शिवसेना यांनी एकमेकांच्या गळयात गळा घातला होता. तेव्हा ताबडतोब इंडिकेट कॉंग्रेसचे सेक्रेटरी बहुगुणा मुंबईत विमानाने आले आणि त्यांनी म्हणे कॉंग्रेसच्या लोकांना चांगलाच दम भरला. महापौराच्या निवडणुकीच्या आधी तर इंडिकेटवाल्याचा कोण प्रयत्न चालू होता शिवसेनेला पाठिंबा देण्याची परवानगी मिळावी म्हणून. पण शेवटच्या क्षणापर्यंत बहुगुणाजीचा नकार. "शिवसेनेशी लढणारे आम्हीच" अशा जोरात घोषणा करणारे इंडिकेट कॉंग्रेस नेते महापौरपदासाठी शिवसेनेशी म्होतूर लावण्यास कसे अधीर झाले होते हे लिहू म्हणता ?

की हे लिहू की शिवसेनेच्या उमेदवाराचा पराभव झाल्यावर शिवसेनेचे नेते कसे ढसढसा रडले सर्वांसमोर आणि ज्यांनी "विश्वासघात" केला त्याचा बदला घेऊ म्हणाले. काही जणानी तर प्रजासमाजवादी पक्षाच्या कचेरीच्या खिडक्याच्या काचाही फोडल्या. अरे राजकारण आणि निवडणुका म्हणजे दोन देणे आणि दोन घेणे. रडता कसले. पण संपादक महाशय, या गोष्टी लिहायच्या नसतात.

. आणखी एक आहे. आपले खासदार आणि आमदार म्हणे दिल्लीत लोकसभेवर धरणे धरणार आहेत. एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात. तेव्हाच धरणार आहेत. कारण त्यावेळी आर्थिक विधेयक मतासाठी येणार आणि दरवेळी इंदिरा गांधीना आपल्या खासदारांना मतदानासाठी उभे करावे लागणार. अशावेळी महाराष्ट्राचे चाळीस पंचेचाळीस खासदार धरणे धरून बाहेर बसले तर इंदिरा गांधीचे सरकार सरळ खाली कोसळणार नाही का ? संपादक महाशय, तुम्हाला वाटते का एवढी हिंमत महाराष्ट्रीय खासदाराची आणि नेत्यांची आहे म्हणून ? का ही एक आपली शुद्ध थाप ? बाईंवर दबाव आणण्यासाठी. कारण सरकार कोसळलं तर काय महाराष्ट्राला बेळगाव मिळणारे आहे होय ? आणि निजलिंगप्पाचं सरकार आले तर बेळगाव गेलं उडत !

तेव्हा संपादक महाराज, धरणे प्रकरणाचा अर्थ जाणकार लोक अनेक प्रकारे

काढतात. कोणी म्हणतात साहेबांना वास लागलाय बाई पडणार म्हणून. आपली शक्ती ते अजमावून पाहताहेत. आणखी कोणी सांगतात ' अहो कसल धरणं वगैरे घेऊन बसलायत ? एवढी हिंमत आहे तरी का महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये ? ऐनवेळी बघा शेपूट खाली घालतोल. "

आता आपल्याला तर या विषयावर कधी लिहायचं नाही. कारण राज्यसभेतला पराभव आणि मुंबई महानगरपालिकेतला पराभव यामुळे महाराष्ट्र कॉंग्रेस जरा गरम झाली आहे या रागात ती काय करेल हे सागता येत नाही. आणि इंदिरा गाधी सरकार कोसळले तर समाजवादाचा झेंडा खांद्यावर घेऊन मिरवणारे महाराष्ट्राचे नेतृत्व आणि महाराष्ट्र कॉंग्रेस कोणत्या दिशेने जाईल हेही सांगता येत नाही.

सपादक महाशय, तुम्हाला आठवते का ? मुबईच्या आझादमैदानावर इंडिकेट कॉंग्रेसच्या खुल्या अधिवेशनात मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून महाराष्ट्र कॉंग्रेसचे नेते श्री. यशवतराव चव्हाण यांनी समाजवादाची शपथ घेतली होती. श्री. चव्हाण म्हणाले होते. "महाराष्ट्राने समाजवादाचा झेडा खाद्यावर घेतला आहे. आता आमची दिशा एकच. आम्ही आमचे मागचे दोर कापले आहेत. पण हे लक्षात ठेवलं पाहिजेल आहे की महाराष्ट्र हा तत्त्वाना मानतो. महाराष्ट्र तत्त्वपूजक आहे, महाराष्ट्र व्यक्तिपूजक कधीच नव्हता. आणि आताही नाही. जेव्हा जेव्हा तत्त्व आणि व्यक्ती यामध्ये निवड करण्याचा प्रसग येईल तेव्हा महाराष्ट्र निश्चितच तत्त्वाच्या मागे जाईल .." वगैरे वगैरे. संपादक महाशय, प्रसंग आल्यास इंदिरागाधींशी काडीमोड करण्याचा दरवाजा श्री. चव्हाणांनी या वाक्याने उघडा ठेवला असा निष्कर्ष काढता येणार नाही काय ? या दरवाजाचा वापर करण्याची वेळ केव्हा येणार आहे ते मात्र माहीत नाही.

सपादक महाशय, तुम्हाला हेही आठवत असेल की मागच्या महिन्यात श्री. बाळासाहेब देसाई याच्या वाढदिवस-सत्कार समारंभात श्री. चव्हाण म्हणाले होते की, वैयक्तिक नेतृत्वाचे दिवस गेले आहेत आजची तरुण पिढी अस्वस्थ आहे. ती एका नेत्याच्या मागे कधीच राहत नाही. ज्यानी गांधी-नेहरूना मानलं नाही ते काय तुम्हा आम्हाला मानणार आहेत ? —

श्री. चव्हाणाचे भाषण अतिशय तोलून मापून केलेले असते. त्यांच्या प्रत्येक वाक्याला, प्रत्येक शब्दाला सदर्भ असतो, असे नाही का वाटत तुम्हाला ?

तेव्हा सपादक महाशय मुख्य मुद्दा हा की या सर्व गोष्टी वार्तापत्रात घालण्याचा कंटाळा आला आहे. अहो; सारखं सारखं तेच ते काय लिहित बसायचं. कधीतरी मुबईतल्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी तुमची काही पृष्ठं राखून ठेवत चला. केवढं थोर काम ते करतात याचा जरा जगाला पत्ता लागू दे. तेव्हा संपादक महाशय, या वेळचं वार्तापत्र छापूच नका झालं. तसदीबद्दल मात्र क्षमस्व.

— वार्ताहर

 [ पृष्ठ ७ वरून ]

वेळ कोणती असेल तर ती हीच या निर्धाराने तो झुरिकहून पेट्रोग्राडकडे निघाला होता.

तीस वर्षांपूर्वी घेतलेल्या प्रतिज्ञेची पूर्तता करण्याचा क्षण जवळ आलेला आहे ही एकच गोष्ट त्याला त्यावेळी जाणवत होती. आपल्या थोरल्या भावाला — अॅलेक्झांडरला — ज्या राजवटीने फाशी दिले त्या राजवटीचा सूड घेण्याची प्रतिज्ञा लेनिनने ज्यावेळी घेतली त्यावेळी त्याचे वय अवघे सतरा वर्षांचे होते. म्हणजे त्याला त्यावेळी राजकारणाची फार मोठी जाण आली होती असे नव्हे. त्यावेळी त्याची ती भावनिक उर्मी होती. पण येथेच लेनिन इतर क्रांतिकारकांपेक्षा वेगळा दिसतो आणि त्यातच त्याचे खरे मोठेपण दिसून येते. जुलुमी झारशाहीविरुद्धचा आपला असतोष व्यक्त करण्यासाठी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये रशियात अनेक क्रांतिप्रयत्न झाले. परंतु त्यापैकी कोणत्याही प्रयत्नामध्ये लोकाना सहभागी करून घेण्याची प्रवृत्ती दिसत नाही. त्याचप्रमाणे क्रांतीनतर काय या प्रश्नाचाही इतर क्रांतिकारकांनी विचार केलेला नव्हता. त्यांना तशी गरजही भासली नाही.

## कार्ल मार्क्सचे शिष्यत्व

असंतुष्ट कामगारवर्ग क्रांतीचे इंधन होऊ शकतो हे लेनिनने हेरले आणि त्यामुळेच तो कामगाराच्या हुकुमशाहीचा पुरस्कार करणाऱ्या मार्क्सवादाकडे वळला. कार्ल मार्क्सचे शिष्यत्व पत्करल्यामुळ लेनिनच्या क्रांतिप्रयत्नाला आपोआपच एका विशाल उद्दिष्टाची बैठक लाभली. त्यामुळेच केवळ रशियाच नव्हे तर सारे जग क्रांतीच्या ज्वाळांनी वेढून टाकण्याची स्वप्ने तो पाहू लागला. परंतु त्याचा हा वैचारिक प्रवास नंतरचा आहे, भावनिक प्रतिज्ञा पहिली आहे ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. लेनिन हा गरीब कुळात जन्मलेला असल्यामुळ लहानपणापासूनच त्याच्या मनात प्रस्थापित भांडवलशाही समाजव्यवस्थेसंबधी राग होता आणि म्हणूनच तो मार्क्स-वादाचा उपासक बनला अशी माहिती रशियामध्ये प्रसिद्ध झालेल्या सरकारी चरित्रांमध्ये मोठ्या चविष्टपणाने सांगण्यात येत असली तरी वस्तुस्थितीची साक्ष तशी नाही. लेनिन हा एका बड्या अमलदाराचा मुलगा होता. त्याच्या वडिलांना समाजात चांगली प्रतिष्ठा होती. लेनिनच्या आईचे माहेरही श्रीमंत होते. इतके की विजनवासात काळ कंठणाऱ्या लेनिनची भिस्त आईकडून येणाऱ्या मनिऑर्डरी-वरच असे. हे सारे लक्षात घेतले की परिस्थितीचा ताण जाणवून लेनिन कामगार-संघटनेकडे वळला ही गोष्ट खरी मानता येत नाही.

अॅलेक्झांडरला फाशी देण्यात येणार आहे ही बातमी कळताच लेनिनने झार-

शाहीच्या विनाशाची प्रतिज्ञा घेतल्यानंतर प्रथम त्याने काय वाचले-अभ्यासिले असेल तर ती नेचॅयेव्हची क्रांतिसूत्रे. स्वतः लेनिननेही ही गोष्ट आपल्या मित्राशी बोलताना कबूल केलेली आहे. १९१७ ची राज्यक्रांती यशस्वी होऊन रशियाचा सर्वसत्ताधीश झाल्यानंतर व्रॉंच ब्रुयेव्हिच या आपल्या मित्राशी बोलताना लेनिन म्हणाला होता "नेचॅयेव्ह हा एक महान क्रांतिकारक होऊन गेला. त्याच्या शिकवणुकीचा तीस वर्षांपूर्वी माझ्या मनावर झालेला परिणाम अद्यापही कायम आहे. सच्चा क्रांतिकारक म्हणून नेचॅयेव्हविषयी मला नेहमीच आदर वाटत आलेला आहे. त्याचे सारे लिखाण आपण पुन्हा छापून लोकांसमोर ठेवले पाहिजे."

यावर ब्रुयेव्हिचने त्याला विचारले. "नेचॅयेव्ह तुला खरोखरच इतका मोठा वाटतो का ?"

लेनिन उत्तरला, "होय. तूही संपूर्ण नेचॅयेव्ह पुन्हा एकदा वाच. विशेषतः त्याची क्रांतिसूत्रे."

अन् म्हणूनच 'सिंहासन किंवा फाशीचा खांब' हे आव्हान पत्करून लेनिन-सारखा अस्सल क्रांतिकारक पेट्रोग्राडला परतला होता. केरेन्स्की यांचे नवे सरकार स्थिरावण्यापूर्वीच ते गदगदा हालवून खाली पाडण्यापूर्वी लेनिनला पुन्हा एकदा विजनवासात जावे लागले. परंतु आपल्यासारख्या आजीव क्रांतिकारकाच्या निर्धारा-पुढे लोकशाही समाजवाद्यांचे हे सरकार टिकू शकणार नाही हे त्याला पक्के माहित होते. त्यातून त्यावेळी रशियन जनमानस युद्धाला कमालीचे कंटाळले होते. या युद्धामुळेच आपल्याला ही अन्नान्नदशा सहन करावी लागत आहे, म्हणून नको ते युद्ध आणि नको तो विजय असे केवळ शेतकरी-कामकरीच नव्हे तर आघाडीवरचे सैनिकही म्हणत होते. केरेन्स्कीची ही घोडचूक ठरली की आपल्या देशबांधवांचे मनोगत त्याला कळलेच नाही. फ्रान्स आणि ब्रिटन यांच्या मदतीने आपण जर्मनीशी झुंजू शकू असे त्याला वाटत होते. केरेन्स्कीची ही चूक लेनिनच्या पथ्यावर पडली. 'बोल्शेव्हिक राजवट तुम्हाला अन्न देईल' या घोषणेत त्याने शांततेचाही अंतर्भाव केला. त्यामुळे साहजिकच सर्वसामान्य माणसाला लेनिनच्या बोल्शेव्हिक पक्षासंबंधी त्या काळात आपुलकी वाटायला लागली.


आणि हे बघ...लोणचे करतांना
बावरून जाऊं नकोस. सरळ ठाकूर यांचा
लोणच्याचा तयार मसाला वापरून
"ह्यांना" खुष कर



लोणची कमी श्रमांत, अल्प खर्चात
रुचकर, टिकाऊ व चवदार बनतात.

ठाकूर आणि मंडळी
माहीम, मुंबई-१६.

## लोकशाहीवर आघात

तरीदेखील जेव्हा बोल्शेव्हिक क्रांती झाली आणि लेनिन सोव्हिएट रशियाचा प्रधानमंत्री झाला तेव्हा बोल्शेव्हिक पक्ष अल्पमतात होता. केरेन्स्कीसंबंधी लोकांमध्ये अप्रीती वाढावी यासाठी मध्यंतरीच्या काळात लेनिन आणि त्याचे सहकारी 'घटनासमिती लवकर बोलवा'. असा आवाज उठवत होते. परंतु सत्ता हाती आल्यानतर घटना समितीची बैठक भरविणे हे आपल्याला गैरसोयीचे ठरणार आहे असे आढळून येताच लेनिनने एखाद्या हुकूमशहाच्या थाटात घटनासमिती बरखास्त केली. इतकेच नव्हे तर विरोधी पक्षावर आणि वृत्तपत्रांवर बंदी घालून लोकशाहीचा मार्ग कायमचा बंद करून टाकला.

सत्ता हाती आल्यानतर प्रारंभीची तीन वर्षे लेनिनला यादवी युद्धाचा बीमोड करण्यात घालवावी लागली. त्यानतर बोल्शेव्हिक राजवट स्थिर होत आहे न आहे तोच त्याला पक्षाघाताच्या विकाराने गाठले. त्यामुळे नव्या रशियाला आपल्या मनाप्रमाणे आकार देण्याची त्याची महत्त्वाकांक्षा सिद्धीला जाऊ शकली नाही. तरीदेखील क्रांतिकारक लेनिन सत्ता हाती आल्यानतर सैद्धान्तिक आग्रहाच्या चौकटीतून बाहेर पडून व्यवहाराच्या पातळीवर येण्याचा प्रयत्न करीत होता हे त्याने पुरस्कारिलेल्या ' नव्या आर्थिक धोरणा 'वरून दिसून येते. ज्या दलित जनतेच्या नावाने आपण सत्ताग्रहण केले आहे त्या जनतेला आपण दिलासा देऊ शकलो नाही ही जाणीव त्याला व्यथित करीत होती. आपल्या हातून रशियन कामगार वर्गावर अन्याय झालेला आहे, ही त्याने आपल्या जीवनाच्या अखेरीस दिलेली कबुली या व्यथेची साक्षीदार आहे.

त्यामुळेच लेनिन हुकुमशहा असला, आपली हुकुमशाही स्थिरपद राखण्यासाठी त्याने झारशाहीतील ' ओखराना ' या गुप्त पोलीस संघटनेवर ताण करील अशी ' चेक ' निर्माण केली असली तरीही हिटलर, मुसोलिनी आदि सत्तापिपासू हुकुमशहांपेक्षा त्यांची प्रकृती सर्वस्वी भिन्न होती हे मान्य केलेच पाहिजे. आपल्याला अभिप्रेत असलेला कार्यक्रम कार्यवाहीत आणावयाचा असेल तर हुकुमशाही--सर्वंकष हुकुमशाही हाच एक मार्ग आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. स्वतःच्या उपभोगासाठी सत्ता राबविणे त्याच्या स्वभावातच नव्हते. त्यामुळे रशियासारख्या महाकाय देशाची सूत्रे हाती आल्यानंतरही क्रांतीपूर्वी ज्या साधेपणाने तो रहात होता तोच साधेपणा त्याने आमरणान्त कटाक्षाने जपला.

लेनिनचा आतरराष्ट्रीयवादही सच्चा होता. झारशाहीच्या वरवंट्याखाली दवल्या गेलेल्या रशियावर आपण थुकतो असे तो वारंवार म्हणत असे. रशियात क्रांती घडवून आणल्यानंतर सर्वत्र आणि विशेषतः युरोपमध्ये समाजवादी क्रांती व्हायला पाहिजे यासाठी त्याचा जीव तळमळत होता. परंतु रशियातील अंतर्गत प्रश्नांनीच त्याला एवढा घेरला होता की आपल्या या उद्दिष्टाकडे लक्ष द्यायला

त्याला फुरसत मिळाली नाही. मार्क्सने पुरस्कारिलेले वर्गविहीन समाजरचनेचे ध्येय आज ना उद्या सिद्धीस जावे या हेतुनेच त्याने क्रांतीचा ध्यास घेतला होता. परंतु आदर्श केवळ विचारात राहतात आणि प्रत्यक्षात मात्र आदर्शाचा उद्घोष होत असतानाच जुन्या जुलमी राजवटीचा अवतार होत असतो हा अनुभव बोल्शेव्हिक क्रांतीनंतर रशियालाही आला. लेनिनच्या मृत्युनंतर त्याच्या वारसदाराने म्हणजे स्टॅलिनने तर उरल्यासुरल्या ध्येयवादालाही 'एका देशात समाजवाद' या घोषणेच्या आधाराने हरताळ फासला, परंतु तो सर्वस्वी वेगळा विषय आहे.

## अद्वितीय कार्य

गेल्या बावन्न-त्रेपन्न वर्षांच्या कालखंडात बोल्शेव्हिक क्रांतीने काय साधले यासबंधी मतभेद असले तरी विसाव्या शतकाला सर्वस्वी वेगळे वळण लावण्याचे अद्वितीय कार्य लेनिनने पार पाडले आहे हे निस्संशय. साम्यवादी क्रांतीवरील त्याची अव्यभिचारी निष्ठा, ती यशस्वी व्हावी यासाठी अथक काम करण्याची जिद्द आणि विपरीत प्रसंगांतही त्याने दाखविलेली अशरण वृत्ती याबद्दल इतिहासाच्या अभ्यासकाला आदरच वाटला पाहिजे. कारण लेनिन नसता तर रशियात बोल्शेव्हिक क्रांती होणे सर्वस्वी अशक्य होते. लेनिनच्या अपेक्षेप्रमाणे ही क्रांती इतर देशात वादळाप्रमाणे पसरत गेली नसली तरी जलप्रवाहाप्रमाणे झिरपत गेली आणि त्यामुळेच आम जनतेच्या आर्थिक असंतोषातून निर्माण होणाऱ्या क्रांतीची धग रशियाप्रमाणे आपल्याला लागू नये या विचाराने इतर देशातील जागरूक सत्ताधाऱ्यांनी विविध सामाजिक स्तरांमधील विषमतेतील दरी शक्य तितकी अरुंद करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. जेथे हे आपण होऊन घडले नाही तेथे संघटित कामगारवर्गाने घडवून आणले. एका दृष्टीने कल्याणकारी राज्याच्या कल्पनेला बोल्शेव्हिक क्रांतीने चालना दिली. म्हणून, संघटित कामगारवर्गाची आजची सुस्थिती हे लेनिनच्या जीवनकार्याचे मोठेच यश ठरते. अर्थात् त्यासाठी रशियन जनतेला फार मोठी किंमत मोजावी लागली आहे.

लेनिन अस्सल क्रांतिकारक असल्यामुळे त्याची इच्छाशक्तीही जबरदस्त होती. साऱ्या जगाला आपल्या मनाप्रमाणे आकार देण्याची जिद्द बाळगून तो अखेरपर्यंत वावरला. त्याच्या विचारांनी आणि कृतीनी राजकीय वातावरणामध्ये निर्माण केलेले हादरे अद्यापही जग अनुभवीत आहे आणि म्हणूनच विसाव्या शतकाने जे महापुरुष पाहिले त्यात लेनिनचे स्थान वरचे आणि वेगळे आहे.

लेनिनच्या जीवनकार्याच्या फलिताविषयी मतभेद असणारे जगही त्याच्या जन्मशताब्दी-महोत्सवात सहभागी होत आहे ते त्यामुळेच. □ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर



"मी हा जखमी झालो तो आमच्या शांततामय निदर्शनाच्या वेळी
पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ शांततामय मोर्चा
नेला त्यावेळी ..."